इति च नूनं त्वमधिसूः ॥ ८४ ॥ कृपालो विश्वेश त्रिभुवनतले ते प्रमितितो दिवारात्रौ स्थानं मिलति वपुषो जानुयुगलम् । अभक्तानित्येतत्कथितमभियुक्तैः समतनोः प्रदुष्यन्ते संप्रत्यापि तादिदमर्थं हि सुदृढम् ॥ ८५ ॥ जगन्मूलं सृष्ट्वा सकलजगतां सर्वकुशलो भवेज्जंघे लक्ष्मीकृदसमसरस्यः प्रकुरुते । प्रकृष्टौ तौ वीरौ भ्रमयितविलक्ष्योल्पगुणवान् मुने ते नानङ्गस्तव तु विमुखो लक्षणवतः ॥ ८६ ॥ नराणां नानार्थप्रदरसगुटित्वं च दधतो मुने गुल्फौ गूढौ तव चरणपुष्ठौ प्रकटितौ । घटावृत्तिर्नार्योरिव सकलकौ वृत्तरुचिरौ विराजेते तेजोनिकरकवितायां सुवपुषा । ८७ ॥ सदाधारं युष्मत्प्रपदमतिपूज्यं सुरुचिरं पुवात्मानं मत्वा जितामिति सदा कच्छपपतिः । विवेशादौ भूमेर्यदि तदिदमेकं स्मयकरं त्विदानीं तज्जातिर्मुकुलितशिराश्चाभवदहो ॥ ८८ ॥ मया दत्तं किंचिन्न यदि कलितं वासवमहं तदा रोचिजानं जननमपि पंकप्रकटिनम् । प्रविश्येत्यायोज्यं न चलति ह यत्तत्वदभिया पदं ते तु श्रीदं सकलसमये श्रीनिलयनम् ॥ ८९ ॥ मुने ते पादाब्जं नवममृतपादोद्भवमहो श्रितः सौन्दर्यं तत्पशुपतिशिरोब्जं हिमकरः । निवृत्तं स्वस्याङ्कं भजति भवदेकात्मपुरुषाः कथं ब्रह्मागारे परमपुरुषानांघ्रिभजनाः ॥ ९० ॥ न चित्रं ते पादौ वितरत इति प्रार्थितफलं विधिं श्रीशं रक्षाकलुषविपदं ह्रस्यमतुलम् । स्मरान्तः श्रीगङ्गाधरचरणशंखाम्बुजसुरद्रुमाश्चंचद्ध्वजाधानतजनपदानंदकलनात् ॥ ९१ ॥ त्रिखण्डैः श्रीविद्यामनुवरभवैर्भावकरिपो विवृद्धस्ते मंत्रो त्रिषवदाति यो ज्योतिरमलम् । षडर्णाचंद्रार्कप्रकररुचि तन्मे प्रभवतां सदा ज्ञानानन्दं युवतिनृमयं लोचनपदम् ॥ ९२ ॥ समुन्मीलद्भानुप्रकररुचिवाग्बीजममलं मरुत्वद्गोपाभां मदनलिपिमाधारकमले । हृदब्जे शक्त्याख्यं सितकरकराभं शिरसिजे सरोजे त्वां ध्यायेत्सकलपुरुषार्थान् स लभते ॥ ९३ ॥ चिदंशत्वाद्रूपं किमपि सवितुर्मण्डलगतं वरेण्यं भर्गो वै त्रिविधतनुदेवस्य वपुषि । मुने धीमह्यासद्भिरपि धियो यो न इतरत्प्रचोदायास्तत्त्वं स्थितिलयसृजस्त्वं मुनिपते ॥ ९४ ॥ हरिस्तंतुः प्रोतः सदासि शिखरे शुभ्रकपटो

जगन्मूलस्थाणुस्त्वमिति सुभवस्पंदमुनिभिः । ज्वरीभिः स्वर्णाढ्यः पवनहततद्विन्दुनिकरैर्जरासक्ताब्जाहीरुचिरमभिषिक्तः स्थित इव ॥ ९५ ॥ दुराचारो जारश्चपलमतिराजः परवशः परद्रव्याकांक्षी बहुजनविरोधी च सततम् । तदा चाहं पूतस्तव पदयुगे स्पर्शवशतो ह्ययःखण्डः स्वर्ण भवति हि यदा सिद्धसुरतिः ॥ ९६ ॥ परिक्रान्ता देशा बहुतरधनस्यार्जनधिया कुलाचारं हित्वा कुमतिनृपसेवापि च कृता । विधायासौ श्रांतः किमपि न च लब्धं तु वपुषाश्रितं त्वत्पादाब्जं श्रितमनुजमन्दारमधुना ॥ ९७ ॥ त्वदीयो मे देहस्त्वमपि पितरौ भ्रातृसुहृदस्त्वमेव ब्रह्मन्मेव सुतहितगृहक्षेत्रनिवहाः । त्वमेव प्राणो मे धनमपि ममत्वात्तव पदं न जाने मय्येव स्थिततरमुहुर्मोयमधुना ॥ ९८ ॥ नमस्ते ताराद्यामृतजलधिधाम्नेधिमहसे नमस्ते ब्रह्माद्यैर्मुनिसुरवरैः क्लृप्तमनसे । नमस्ते यन्नारायणमुनिविलासाय भवते मनूनां कोटीनामचलगणितानां च पतये ॥ ९९ ॥ नमस्ते देवैरप्यविदितमाहिम्नेऽतियशसे नमस्ते दिक्पालप्रकटमुकुटालंकृतपदे । नमस्ते तेजस्विन्नतमनुजमन्दारवपुषे नमो दत्तात्रेयाकृतिहरिहराजाय महते ॥ १०० ॥ नमस्ते पापौघाचलविततिसंहारपतये नमस्ते दारिद्र्यव्यथितजनदैवांतनिलये नमस्ते रोगार्तानतमनुजदिव्यौषधिदृशे नमस्ते दैवं मे नहि नहि जगत्यां तव पदम् ॥ १०१ ॥ असौ दत्ताद्रेयस्तुतियुतकृतिर्ज्ञानलहरी सुधाधारापूराखिलनिगमसारानुपठताम् । श्रुतश्रीविद्या गुर्विभवधनधान्यामृतचयं ददात्येवात्यन्तं जयति सकलाल्हादजनिका ॥१०२॥ इति श्रीदत्तात्रेयज्ञानलहरीदलादनमुनिविरचिता श्रीदत्तपदप्रापिका सम्पूर्णा ॥

## अथ दत्तात्रेय-वज्रकवचम् ।

श्रीगणेशायनमः ॥ अथ दत्तवज्रकवचम् ॥ ऋषयः ऊचुः । कथं संकल्पसिद्धि । स्याद्वेदव्यास कलौ युगे ॥ धर्मार्थकाममोक्षाणां साधनं किमुदाहृतम् ॥ १ ॥ व्यास उवाच ॥ शृण्वन्तु ऋषयः सर्वे शीघ्रं संकल्पसाधनम् ॥ सकृदुच्चारमात्रेण भोगमोक्षप्रदाः

यकम् ॥ २ ॥ गौरीशृंगे हिमवतः कल्पवृक्षोपशोभिते ॥ दीप्ते दिव्य-
महारत्नहेममण्डपमध्यगम् ॥ ३ ॥ रत्नसिंहासनासीनं प्रसन्नं
परमेश्वरम् ॥ मंदस्मितमुखांभोजं शंकरं प्राह पार्वती ॥ ४ ॥
श्रीदेव्युवाच ॥ देवदेव महादेव लोक शंकरशंकर ॥ मंत्र
जालानि सर्वाणि यंत्रजालानि कृत्स्नशः ॥ तंत्रजालान्यनेकानि
मया त्वत्तः श्रुतानि वै ॥ इदानीं द्रष्टुमिच्छामि विशेषेण मही-
तलम् ॥ ६ ॥ इत्युदीरितमाकर्ण्य पार्वत्याः परमेश्वरः ॥ करेणा-
मृज्य संतोषात्पार्वतीं प्रत्यभाषत ॥ ७ ॥ मयेदानीं त्वया सार्धं
वृषमारुह्य गम्यते ॥ इत्युक्त्वा वृषमारुह्य पार्वत्या सह शंकरः
॥ ८ ॥ ययौ भूमण्डलं द्रष्टुं गौर्याश्चित्राणि दर्शयन् ॥ क्वचिद्विंध्या-
चलप्रान्ते महारण्ये सुदुर्गमे ॥ ९ ॥ तत्र व्याहर्तुमायान्तं भिल्लं
परशुधारिणम् ॥ वध्यमानं महाव्याघ्रं नखदंष्ट्राभिरावृतम् ॥ १० ॥
अतीव चित्रचारित्र्यं वज्रकायसमायुतं ॥ अप्रयत्नमनायासमखिन्नं
सुखमास्थितम् ॥ ११ ॥ पलायन्तं मृगं पश्चाव्द्याघ्रो भीत्या पला-
यितः ॥ एतदाश्चर्यमालोक्य पार्वती प्राह शंकरम् ॥ १२ ॥ कि-
माश्चर्यं किमाश्चर्यमग्रे शंभो निरीक्ष्यताम् ॥ इत्युक्तः सततः शंभु-
र्दृष्ट्वा प्राह पुराणवित् ॥ १३ ॥ गौरि वक्ष्यामि ते चित्रमवाङ्मानस-
गोचरम् ॥ अदृष्टपूर्वमस्माभिर्नास्ति किंचिन्न कुत्रचित् ॥ १४ ॥
मया सम्यक्समासेन वक्ष्यते शृणु पार्वती ॥ अयं दूरश्रवा नाम
भिल्लः परमधार्मिकः ॥ १५ ॥ समित्कुशप्रसूनानि कंदमूलफलादि-
कम् ॥ प्रत्यहं विपिनं गत्वा समादाय प्रयासतः ॥१६॥ प्रिये पूर्वं
मुनींद्रेभ्यः प्रयच्छति न वांछति ॥ तेऽपि तस्मिन्नपि दयां कुर्वन्ते
सर्वमौनिनः ॥१७॥ दलादनो महायोगी वसन्नेव निजाश्रये ॥ कदा-
चिद्स्मर्तृत्सिद्धं दत्तात्रेयं दिगम्बरम् ॥ १८ ॥ दत्तात्रेयः स्मर्तृगा-
मी चेतिहासं परीक्षितुम् ॥ तत्क्षणात्सोऽपि योगींद्रो दत्तात्रेयः स-
मुत्थितः ॥ १९ ॥ तं दृष्ट्वाश्चर्यतोषाभ्यां दलादनमहामुनिः ॥
संपूजाग्रे निषीदन्तं दत्तात्रेयमुवाच तम् ॥ २० ॥ मयोपहूतः संप्रा-
प्तो दत्तात्रेय महामुने ॥ स्मर्तृगामी त्वमित्येतत्किंवदन्ती परीक्षि-
तुम् ॥२१॥ मयाद्य संस्मृतोऽसि त्वमपराधं क्षमस्व मे ॥ दत्तात्रेयो

मुनिं प्राह मम प्रकृतिरीदृशी ॥ २२ ॥ अभक्त्या वा सुभक्त्या वा यः स्मरेन्मामनन्यधीः॥तदानीं तमुपागत्य ददामि तदभीप्सितम् ॥ २३ ॥ दत्तात्रेयो मुनिं प्राह दलादनमुनीश्वरम् ॥ यदिष्टं तद् वृणीष्व त्वं यत्प्राप्तोऽहं त्वया स्मृतः ॥ २४ ॥ दत्तात्रेयं मुनिः प्राह मया किमपि नोच्यते ॥त्वच्चित्ते यत् स्थितं तन्मे प्रयच्छ मुनिपुंगव ॥२५॥ दत्तात्रेय उवाच ॥ ममास्ति वज्रकवचं गृहाणेत्यवदन्मुनिं ॥ तथेत्यंगीकृतवते दलादमुनये मुनिः ॥ २६ ॥ स्ववज्रकवचं प्राह ऋषिच्छन्दःपुरःसरम् ॥ न्यासं ध्यानं फलं तत्र प्रयोजनमशेषतः ॥ २७ ॥ अस्य श्रीदत्तात्रेयवज्रकवचस्तोत्रमंत्रस्य ॥ किरातरूपी महारुद्र ऋषिः। अनुष्टुप् छन्दः॥ श्रीदत्तात्रेयो देवता॥ द्रां बीजम्॥ आं शक्तिः॥ क्रौं कीलम्॥ ॐ आत्मने नमः॥ॐ द्रीं मनसे नमः॥ ॐ आं द्रीं श्रीं सौः ॐ क्लां क्लीं क्लूं क्लैं क्लौं क्लः॥ श्रीदत्तात्रेयप्रसाद-सिध्यर्थे जपे विनियोगः॥ ॐ द्रां अंगुष्ठाभ्यां नमः॥ ॐ द्रीं तर्जनी-भ्यां० ॥ ॐ द्रूं मध्यमाभ्यां० ॥ ॐ द्रैं अनामिका० ॥ ॐ द्रौं कनि-ष्ठिका० ॥ ॐ द्रः करतलकरपृष्ठाभ्यां० ॥ एवं हृदयादिन्यासः ॥ ॐ भूर्भुवःस्वरोमिति दिग्बंधः। अथ ध्यानं ॥ जगदंकुरकंदाय सच्चिदानंदमूर्तये ॥ दत्तात्रेयाय योगींद्रचन्द्राय परमात्मने ॥१॥ कदा योगी कदा भोगी कदा नग्नः पिशाचवत् । दत्तात्रेयो हरिः साक्षाद्भुक्तिमुक्तिप्रदायकः ॥ २ ॥ वाराणसीपुरस्नायी कोल्हा-पुरजपादरः ॥ माहुरीपुरभिक्षाशी सह्यशायी दिगंबरः ॥ ३ ॥ इन्द्रनीलसमाकारश्चन्द्रकान्तिसमद्युतिः ॥ वैडूर्यसदृशस्फूर्तिं-श्चलत्किंचिज्जटाधरः ॥ ४ ॥ स्निग्धधावल्ययुक्ताक्षोऽत्यंतनील-कनीनिकः ॥ भ्रूवक्षःश्मश्रुनीलांकः शशांकसदृशाननः ॥५॥ हास-निर्जितनीहारः कंठनिर्जित कंबुकः ॥ मांसलांसो दीर्घबाहुः पाणिनिर्जितपल्लवः ॥ ६ ॥ विशालपीनवक्षाश्च ताम्रपाणिर्द-लोदरः ॥ पृथुलश्रोणिललितो विशालजघनस्थलः ॥ ७ ॥ रंभा-स्तंभोपमानोरुर्जानुपूर्वैकजंघवः ॥ गूढगुल्फः कूर्मपृष्ठो ल-सत्पादोपरिस्थलः ॥ ८ ॥ रक्तारविंदसदृशरमणीयपदाधरः ॥ चर्माम्बरधरो योगी स्मर्तृगामी क्षणे क्षणे ॥९॥ ज्ञानोपदेशनिरतो

विपद्धरणदीक्षितः ॥ सिद्धासनसमासीन ऋजुकायो हसन्मुखः ॥ १० ॥ वामहस्तेन वरदो दक्षिणेनाभयंकरः ॥ बालोन्मत्तपिशाचाभिः कचिद्युक्तः परीक्षितः ॥ ११ ॥ त्यागी भोगी महायोगी नित्यानन्दो निरंजनः ॥ सर्वरूपी सर्वदाता सर्वगः सर्वकामदः ॥१२॥ भस्मोद्धूलितसर्वांगो महापातकनाशनः ॥ भुक्तिप्रदो मुक्तिदाता जीवन्मुक्तो न संशयः ॥ १३ ॥ एवं ध्यात्वानन्यचित्तो मद्वज्रकवचं पठेत् ॥ मामेव पश्यन् सर्वत्र स मया सह संचरेत् ॥१४॥ दिगम्बरं भस्मसुगंधलेपनं चक्रं त्रिशूलं डमरुं गदायुधम् ॥ पद्मासनं योगिमुनींद्रवंदितं दत्तेति नामस्मरणेन नित्यम् ॥ १५ ॥ अथ पंचोपचारैः संपूज्य ॥ ॐ द्रां १०८ जपः ॥ [ ॐ दत्तात्रेयः शिरः पातु सहस्राब्जेषु संस्थितः । भालं पात्वानसूयेयश्चंद्रमण्डलमध्यगः ॥ कूर्चं मनोमयः पातु हं क्षं द्विदलपद्मभूः ॥ ज्योतीरूपोऽक्षिणी पातु पातु शब्दात्मकः श्रुती ॥ २ ॥ नासिकां पातु गंधात्मा मुखं पातु रसात्मकः ॥ जिह्वां वेदात्मकः पातु दंतोष्ठौ पातु धार्मिकः ॥ ३ ॥ कपोलावत्रिभूः पातु पात्वशेषं ममात्मवित् ॥ स्वरात्मा षोडशाराब्जस्थितः स्वात्मावताद्गलम् ॥ स्कन्धौ चन्द्रानुजः पातु भुजौ पातु कृतादिभूः ॥ जत्रुणी शत्रुजित्पातु पातु वक्षःस्थलं हरिः ॥ ५ ॥ कादिठांतद्वादशारपद्मगोमरुदात्मकः ॥ योगीश्वरेश्वरः पातु हृदयं हृदयस्थितः ॥ ६ ॥ पार्श्वे हरिः पार्श्ववर्ती पातु पार्श्वस्थितः स्मृतः ॥ हठयोगादियोगज्ञः कुक्षी पातु कृपानिधिः ॥ ७ ॥ डकारादिफकारांतदशारसरसीरुहे ॥ नाभिस्थले वर्तमानो नाभिं वह्न्यात्मकोऽवतु ॥ ८ ॥ वह्नितत्त्वमयो योगी रक्षतान्मणिपूरकम् ॥ कटिं कटिस्थब्रह्माण्डवासुदेवात्मकोऽवतु ॥ ९ ॥ बकारादिलकारान्तषट्पत्रांबुजबोधकः ॥ जलतत्त्वमयो योगी स्वाधिष्ठानं ममावतु ॥ १० ॥ सिद्धासनसमासीन ऊरू सिद्धेश्वरोऽवतु ॥ वादिसांतचतुष्पत्रसरोरुहनिबोधकः ॥ ११ ॥ मूलाधारं महीरूपो रक्षताद्वीर्यनिग्रही ॥ पृष्ठं च

सर्वतः पातु जानुं न्यस्तकरांबुजः ॥ १२ ॥ जंघे पात्ववधूतेंद्रः पात्वंघ्री तीर्थपावनः ॥ सर्वांगं पातु सर्वात्मा रोमाण्यवतु केशवः ॥ १३ ॥ चर्मचर्मांबरः पातु रक्तं भक्तिप्रियोऽवतु ॥ मांसं मांसकरः पातु मज्जां मज्जात्मकोऽवतु ॥ १४ ॥ अस्थीनि स्थिरधीः पायान्मेधां वेधाः प्रपालयेत् ॥ शुक्रं सुखकरः पातु चित्तं पातु दृढाकृतिः ॥ १५ ॥ मनो बुद्धिमहंकारं हृषीकेशात्मकोऽवतु ॥ कर्मेन्द्रियाणि पात्वीशः पातु ज्ञानेंद्रियाण्यजः ॥ १६ ॥ बंधून् बंधूत्तमः पायाच्छत्रुभ्यः पातु शत्रुजित् ॥ गृहारामधनक्षेत्र-पुत्रादीञ् छंकरोऽवतु ॥ १७ ॥ भार्यां प्रकृतिवित्पातु पश्वादीन् पातु शार्ङ्गभृत् ॥ प्राणान्पातु प्रधानज्ञो भक्ष्यादीन् पातु भास्करः ॥ १८ ॥ सुखं चंद्रात्मकः पातु दुःखात्पातु पुरांतकः ॥ पशून्पशुपतिः पातु भूतिं भूतेश्वरो मम ॥ १९ ॥ प्राच्यां विषहरः पातु पात्वाग्नेय्यां मखात्मकः ॥ याम्यां धर्मात्मकः पातु नैर्ऋत्यां सर्ववैरिहृत् ॥ २० ॥ वराहः पातु वारुण्यां वायव्यां प्राणदोऽवतु ॥ कौबेर्यां धनदः पातु पात्वैशान्यां महागुरुः ॥ २१ ॥ ऊर्ध्वं पातु महासिद्धः पात्वधस्ताज्जटाधरः । रक्षाहीनं तु यत्स्थानं रक्षत्वादिमुनीश्वरः ॥ ]

माला मंत्रजपः हृदयादिन्यासः ॥ एतन्मे वज्रकवचं यः पठेच्छृणुयादपि ॥ वज्रकायश्चिरंजीवी दत्तात्रेयोहमब्रुवम् ॥ २३ ॥ त्यागी भोगी महायोगी सुखदुःखविवर्जितः ॥ सर्वत्र सिद्धसंकल्पो जीवन्मुक्तोद्य वर्तते ॥ २४ ॥ इत्युक्त्वान्तर्दधे योगी दत्तात्रेयो दिगम्बरः ॥ दलादनोपि तज्जप्त्वा जीवन्मुक्तः स वर्तते ॥२५॥ भिल्लो दूरश्रवा नाम तदानीं श्रुतवानिदम् ॥ सकृच्छ्रवणमात्रेण वज्राङ्गोभवदप्यसौ ॥ २६ ॥ इत्येतत् वज्रकवचं दत्तात्रेयस्य योगिनः ॥ श्रुत्वाशेषं शम्भुमुखात्पुनरप्याह पार्वती ॥ २७ ॥ पार्वत्युवाच ॥ एतत्कवचमाहात्म्यं वद विस्तरतो मम ॥ कुत्र केन कदा जाप्यं किं यज्जाप्यं कथं कथम् ॥ २८ ॥

उवाच शम्भुस्तत्सर्वं पार्वत्या विनयोदितम् ॥ शिव उवाच ॥ शृणु पार्वति वक्ष्यामि समाहितमनाविलम् ॥ २९ ॥ धर्मार्थकाम-मोक्षाणामिदमेव परायणम् ॥ हस्त्यश्वरथपादातिसर्वैश्वर्य प्रदायकम् ॥ ३० ॥ पुत्रमित्रकलत्रादि सर्वसंतोषसाधनम् । वेदशास्त्रादिविद्यानां निधानं परमं हितत् ॥ ३१ ॥ सङ्गीतशास्त्र-साहित्यसत्कवित्वविधायकम् ॥ बुद्धिविद्यास्मृतिप्रज्ञामतिप्रौढि-प्रदायकम् ॥ ३२ ॥ सर्वसंतोषकरणं सर्वदुःखनिवारणम् ॥ शत्रु-संहारकं शीघ्रं यशःकीर्तिविवर्धनम् ॥ ३३ ॥ अष्टसंख्या महा-रोगाः सन्निपातास्त्रयोदश ॥ षण्णवत्यक्षिरोगाश्च विंशतिर्मेह-रोगकाः ॥ ३४ ॥ अष्टादश तु कुष्ठानि गुल्मान्यष्टविधान्यपि । अशीतिर्वातरोगाश्च चत्वारिंशत्तु पैत्तिकाः ॥ ३५ ॥ विंशति श्लेष्मरोगाश्च क्षयचातुर्थिकादयः ॥ मंत्रयंत्रकुयोगाद्याः कल्प तन्त्रादिनिर्मिताः ॥ ३६ ॥ ब्रह्मराक्षसवेतालकूष्माण्डादिग्रहो द्भवाः ॥ संग्रजा देशकालस्थास्तापत्रयसमुत्थिताः ॥ ३७ ॥ नवग्रहसमुद्भूता महापातकसम्भवाः ॥ सर्वे रोगाः प्रणश्यन्ति सहस्रावर्तनाद् ध्रुवम् ॥ ३८ ॥ अयुतावृत्तिमात्रेण वंध्या पुत्रवती भवेत् ॥ अयुतद्वितयावृत्त्यापमृत्युजयो भवेत् ॥ ३९ ॥ अयुत-त्रितयाच्चैव खेचरत्वं प्रजायते ॥ सहस्रादयुतादर्वाक् सर्वकार्याणि साधयेत् ॥ ४० ॥ लक्षावृत्त्या कार्यसिद्धिर्भवत्येव न संशयः ॥४१॥ विषवृक्षस्य मूलेषु तिष्ठन्वै दक्षिणामुखः ॥ कुरुते मासमात्रेण वैरिणं विकलेन्द्रियम् ॥ ४२ ॥ औदुम्बरतरोर्मूले वृद्धिकामेन जाप्यते ॥ श्रीवृक्षमूले श्रीकामी तिंतिणी शांतिकर्मणि ॥ ४३ ॥ ओजस्कामोऽश्वत्थमूले स्त्रीकामैः सहकारके ॥ ज्ञानार्थी तुलसीमूले गर्भगेहे सुतार्थिभिः ॥ धनार्थिभिस्तु सुक्षेत्रे पशुकामैस्तु गोष्ठके ॥ देवालये सर्वकामैस्तत्काले सर्वदर्शितम् ॥ ४५ ॥ नाभिमात्र-जले स्थित्वा भानुमालोक्य यो जपेत् ॥ युद्धे वा शास्त्रवादे

वा सहस्रेण जयो भवेत् ॥ ४६ ॥ कण्ठमात्रे जले स्थित्वा यो रात्रौ कवचं पठेत् ॥ ज्वरापस्मारकुष्ठादितापज्वरनिवारणम् ॥ ४७ ॥ यत्र यत्स्यात्स्थिरं यद्यत्प्रसक्तं तन्निवर्तते ॥ तेन तत्र हि जप्तव्यं ततः सिद्धिर्भवेत् ध्रुवम् ॥ ४८ ॥ इत्युक्त्वा च शिवो गौर्यै रहस्यं परमं शुभम् ॥ यः पठेत्वज्रकवचं दत्तात्रेयसमो भवेत् ॥४९॥ एवं शिवेन कथितं हिमवत्सुतायै प्रोक्तं दलाद्मुनयेऽत्रिसूतेन पूर्वं ॥ यः कोऽपि वज्रकवचं पठतीह लोके दत्तोपमश्चरति योगिवरश्चिरायुः ॥ ५० ॥ इति श्रीरुद्रयामले हिमवत्खण्डे मंत्रशास्त्रे उपासनाकाण्डे शिवविजयसिद्धान्ते उमामहेश्वरसंवादे दत्तात्रेयवज्रकवचस्तोत्रं संपूर्णम् ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ शुभं भूयात् । इति दत्तात्रेयवज्रकवचम् ॥

# श्रीदत्तचरित्रामृत

## अत्रीचा आश्रम

तंव तें मायापुरीचें शिखर । दाविता झाला सर्वेश्वर । परम रमणीय वृक्ष अपार । लवले भारफळपुष्पीं ॥ ५० ॥ शाल तमाल नारळी । जांबजांबूळ पोफळी । अंजीर उतोतीया जायफळी । केळीं कर्दळीं कंब्रख ॥५१॥ निंभारे निंब निंबोनिया । चांपे बकुळी खिरणिया । देवदार कृष्णागरमलिया । जाई जुई मोगरे ॥ ५२ ॥ हिरड बाहाळे रातांजन । आंवळी ब्याहाडे अंजन । फणस पांभारे कांचन । वंपस धनतोरणें ॥ ५३ ॥ सिरसहिंगणधावडा । रुई मांदार केवडा । केतकी करंजी पेवडा । ताड माडखर्जुरा ॥ ५४ ॥ बाभळी वकान सेवरी । चिंच शमी आंबे बदरी । अश्वत्थ मेदले अंबरीं । वट साविस्तरी वाढले ॥ ५५ ॥ अगस्ती शेवगे सारफळ । वरुसूर्य देवनळ । अशोक औदुंबर टाकळ । आपटा ये कळक ठाके ॥५६॥ बेल तुळसी शेवती । पांच दौने घमकारती मर्वे कोऱ्हांटे शोभती । कमळें

विकसती जळठाई ॥ ५७ ॥ कुड्गुलछबु गुल्तर। गुल्लमेहदिगुल्लदावनी-अनार । नारंगी नेवाळी तगर । तरटीं खदिरते दुवे ॥ ५८ ॥ लवंगा दोडे नागवेली। द्राक्षामंडप पवळवेली। तोंडले पडोळे गुळवेली। परवर कारली कढवंचे ॥५९ ॥ फणस मोहो पारिजातक । कौठ भोंकरे साग देख। दार्दिवन-रुद्राक्ष अलोकिक। मिरी झुबक धायटि ॥६०॥ चार पिस्ते बदाम ऊंस । कपूर कर्दळी विशेष । वैजयंतीचा सुवास । आसपास धांवत ॥ ६१ ॥ वृक्ष वर्णिले अल्पमती । परी अनेक असती वनस्पती । कंद मुळीं नाहीं गणती । श्वापदें वसती त्यांमाजीं ॥ ६२ ॥ जेथें मकरंद अपार । तेथें वसती उरक भ्रमर । जेथें लवले फळभार । तेथें संचार बहुतांचा ॥ ६३ ॥ ते यथामति करून। वर्णिल्यांतील किंचित निरूपण । परिसा श्रोते चित्त देवोन । सुशोभित वन ज्या योगें ॥ ६४ ॥ साळ्या शुकमयोरे । बकवेलाल तीतरे । भारद्वाज तास नकुळ फिरे । माकडें वानरें रीस पै ॥६५॥ घारी कावळे कोळसा । गृध्र ससाना ढोकसा। कर्कोट पांडव सारसा। कोकिळा सरसा बोलती ॥६६॥ बकबदकें हंस । कुकडिजळीं करी वास । चकवीचे डोल खबुतरें विशेष । पारवे सुरस घुमघुमती ॥ ६७ ॥ चिमण्या तिटवी नीलकंठ । शकुंत कुकडे परीट । चित्रुक पिंगळे कलकलाट । रजनीं धीट वाघुळा घुगु ॥ ६८ ॥ पतंग पाकोळ्या भ्रमर । शार्दूल कुकुटथोर । सायाळ बिल्लाविला अनिवार । मैना सुंदर बोलती ॥ ६९ ॥ अनेक पक्षियांचे पाळे । गुजबुजिती कर्कश रसाळे । तेंवी श्वापदांचीं कुळें । आनंद मेळे डुल्लती ॥ ७० ॥ मृग चितळे सांबर । सिंह व्याघ्र कुंजर । रोही म्हैसे शूकर । अरण्यें अपार तें ठाईं ७१ ॥ जवादि मृग मांजरे । गौतमीचीं वन खिल्लारें । ससेंटेंभवृक भयंकरे । तरस खोंकरें जंबुक ॥ ७२ ॥ ससे गेंडे आणि नीळ। उदभूमीवृक्षीं नीळ । सर्प नाग माहंडूळ । अजगर विशाळ पसरले ॥ ७३ ॥ पक्षी श्वापदांच्या नाना याती । त्या वनीं शब्दीं गर्जती। जळचरें जळीं फिरती । यथामती निवेदूं ॥ ७४ ॥ मीन मासोळी टोक वावटि असती लंबक । किडे कांसवें मंडुक । विरोळे देख सळसळती ॥ ७५ ॥ मगर सूसरी विशाळ । जळीं तंतू ते सबळ । खेंकडे गाई द्विगुल । मनुष्यें कोमळसानजळीं ॥ ७६ ॥ चळचरें जळीं विचरतीं । वनचरें भूमीं धांवतीं । वृक्षीं विहंगम बोलती । भूगर्भी वसतीं श्वापदें ७७ ॥ ऐसी बावन गव्हारीं । जळस्थानें नानापरी।

आश्रम गुव्हा कपारी । कुटिका नागरी ठाईं ठाईं ॥ ७८ ॥ तेथें अत्रि-मुनींचा आश्रम । तपाचरणीं युग्म उत्तम । तो सकळाचा विश्राम । दे आराम पांथिका ॥ ७९ ॥ त्या वनाप्रती जातां । सुख संतोष उपजे चित्ता । दूर पळे उद्विग्नता । अंगीं व्यथा नुरेची ॥ ८० ॥

## अनसुयेचे डोहाळे

परिसोनी स्वामीचें वचन । सती झाली आनंदघन । भावें वंदोनिया चरण । करी भाषण नम्रत्वें ॥ १ ॥ अहो जी स्वामी प्राणेश्वरा । दयानिधीजी कृपा सागरा । माझी विनंती अवधारा । उदार धीरा सतेजा ॥ २ ॥ तुमचें करावें चरणसेवन । मज आवडतें हें तपोवन । स्वइच्छें करावें भ्रमण । आणि तीर्थाटन करावें ॥ ३ ॥ करावा वाटे योगाभ्यास । जप अनुष्ठानादि तपास । भिक्षाटणीं उल्हास । कृती विशेष दावावी ॥ ४ ॥ विषयभोगी वासना । न रुचे कांहीं माझिया मना । कुतर्क विपरीत भावना नये ध्याना कांहींच ॥ ५ ॥ आत्मचर्चा ज्ञानविवेक । वेदांतविषय ऐकतां सुख । आत्मनिष्ठत्व अलौकिक । संवाद साम्यक संयुक्त ॥ ६ ॥ बोध आवडे अत्यंत मानसीं । वाटतें करूं सिद्धिरिद्धि दासी । जीव कळवळा उपजे मानसीं । उदंड भाग्यासी वोपावें ॥ ७ ॥ नाना सुरस करावें सेवन । करवावें तें आणि कां लागोन । हेंचि इच्छितें माझें मन । वैराग्य धारण करावें ॥ ८ ॥

## ॥ डोहाळे-जेवण ॥

द्राक्षमंडपा तळवटीं । शय्या करविली गोमटी । लीला लाघवें सांगत गोष्टी । निद्रें दृष्टी झांकोळली ॥ ८४ ॥ किंचित सुषुप्ती सारून । प्राशित्या झाल्या सुवासिक जीवन । नाना वृक्षीं हिंदोळे बांधोन । गीत गावोन झूलति ॥ ८५ ॥ झुले सरतां मागुती । रमणीक छायेसी बैसती । मध्य पीठ अनसूयासती । सर्वे शोभती सुवासिनी ॥ ८६ ॥ केळीं नारळे द्राक्षा-घड । उतोतिया खिराणिया गोड । चारे बोरें जांब आक्रोड । पक्व निवाड आणिती ॥ ८७ ॥ नारिंगें आंजीरें सीताफळ । साखर निंबें फणस राम-फळ । मुखरसीकजे सुढाळ । मेवा सकळ आणिला ॥ ८८ ॥ ते अन-सूयेपुढें ठेविती । स्वकरें ऋषिपत्न्यांसी वाटिती । नयावरी उपजे प्रीती ।

तें स्वीकारिती आवडिनें ॥ ८९ ॥ हेहि परवडि सारोन । हळदीकुंकुमें वाटिती पूर्ण । करोद्वर्तन कर्पूर चंदन । करविती लेपण सकळांसी ॥ ७ ॥ सेवंती जाई मोगरा । जुई बकुळी पुन्नागरा । ऐसिया पुष्पें गुंफोनि हारा । घालिती सुंदरा अनसूये ॥ ९० ॥ वस्त्रें आभरणें देवोनी । फळें ओटीं भरती कामिनी । याचि रीतीं सुवासिनी । अनसूया पूजोनि गौरवी ॥९१॥ यापरी सातव्यांत गौरव । डोहोळेजेवणादि अपूर्व । देवोनी बोळविल्या कामिनी सर्व । आनंदमेव अनसूया ॥ ९२ ॥

## ॥ श्रीदत्त-जन्म ॥

हेमंतऋतु मार्गेश्वर । शुक्लपक्ष इंदुवासर । साध्ययोग रोहिणी नक्षत्र । चतुर्दशी परपौर्णिमा ॥ ३५ ॥ अमृत वेळा साधून । उभय आडवेळा ती लक्षून । न जाणवतां कवणा लागून । अविनाश पूर्ण प्रगटले ॥ ३६ ॥

## ॥ बारसे ॥

मग ऋषिपत्न्या उठोनि प्रौढा बाळा । अनसूयेसी अर्चिती तये वेळां । नूतन वस्त्रें देवोनि परिमळा । वरी तांबूला अर्पिती ॥ २६ ॥ बैसवोनीया चौकासनीं । ओसंगा बाळातें देवोनी । नारी करितातीं अक्षवणी । बाळां निरखोनी पहाती ॥ २७ ॥ समस्तांसी सन्मानें गौरविलें । परमानंदें बारसें केलें । पुढिलें कार्यातें योजिलें । स्मरतां झालें सिद्धची ॥ २८ ॥ रजनी गेली सुखशयनीं । नित्यकर्म प्रभातें सारोनी । ऋषिपत्न्या पाचारोनी । बैसकांसनीं बैसल्या ॥ २९ ॥ छतें आणि झालरी । देवोनि पालख बांधिला कुसरी । डोल्हारें खेळणें वरी । नानापरी बांधलें ॥ ३० ॥ वस्त्रालंकार लेणीं । बाळका लेववी अनसूया राणी । हरिद्राकुंकुमें करोनी । ताटें भरोनी सिद्धपुढे ॥३१॥ शर्करें भरिल्या पराता । केली तांबुलाची सिद्धता । सुंठवडे आणि क्षीरापता घुगऱ्या अवश्यता करावती ॥ ३२ ॥ तेरावे दिवसातें लक्षून । विमानीं बैसोनी आले सुरगण । देव ललना वाणें घेऊन । आनंदें करून पावल्या ॥ ३३॥ ब्रम्हा विष्णु महेश्वर । अष्टदिग्पाळांसहित अमरेंद्र । वाद्य नादें कोंदलें अंबर । गंधर्व सुंदर गातातीं ॥ ३४ ॥ रमा उमा सावित्री । सरस्वती आणि गायत्री । सर्वे सख्या कुरंगनेत्री । हास्यवक्त्री सतेजा ॥ ३५ ॥ पेहेरणी

कुंचडीं नग । कुंच्यातांडिलप्रायसुरंग । अनसुयेलागीं उपभोग । दिव्य चांग आणिले ॥ ३६ ॥ ऐसियासमारंभेसीं । आनंदें ललना स्वर्गवासी । अनसुयेच्या आश्रमासी । अतिवेगेसीं पावल्या ॥ ३७ गजबजीला अवघा पर्वत। अत्रि अनसूया आनंद भरित । ऋषिभार मिळाले बहुत । नाम संकेत ऐकावया ॥ ३८ ॥ महावैष्णव नारदमुनि । तेही तात्काळ पावले येवोनी । अत्री अनसूयेसी भेटोनी । स्थीरासनीं राहिले ॥३९॥ तंव देव ललनापुढें येती । अनसूया वदी तयांप्रती । येरी सकळां क्षेम देती । मग गौरविती सतीतें ॥ ४० ॥ हरिद्रा कुंकुम देवोन । नेत्रीं सुदविती अंजन । दंतीं लेवविती दांतवण । अलकार लेणं शोभविती ॥४१॥ अंगडीं आणि टोपडीं । बाळका लेवविती तेंचि घडीं । माठलें बिंदलें ल्वडसवडी । चरणकडीं पैंजणें ॥ ४२ ॥ जडितगांठलें कंठीं सुंदर । बीजवरें लाविलें भाळावर क्षुद्रघंटचें कटिसूत्र । मनगस्था विचित्र अमोल्य ॥ ४३ ॥ पदकरी ते इष्टमणी । वाघनखें ताईत सतेजपणीं । नानापरिचीं बोलेलेगीं । लेववी वरोनीं कुंचीतें ॥ ४४ ॥ स्वर्गउपभोग जे आणिले । अनसूयेलागीं समर्पिले । सकळ नितंबिनींनीं आपुले । वाणें पुढें ठेविलीं ॥४५॥ ऋषि म्हणती तये वेळां । सुमुहूर्त उत्तम पावला। पालखीं घाला वेगीं बाळा। उरला सोहाळा पुढें करा ॥ ४६॥ ऐसें ऐकोनी वचनासी। सावित्री होय तेव्हां सरसी। वेगीं उचलोनि बाळासी । घाली पालखासी नेवोनी ॥ ४७ ॥ रमा येवोनी पुढती । पालख दोर धरी हातीं । रमा म्हणे गावोनि गीतीं । बाळाप्रती हालवावें ॥ ४८ ॥ तंव गायत्री सरस्वती येऊन । सुरललना सांगातें घेऊन । म्हणती सांगा याचें नाम कोण । गाऊं गुण तैसेंची ॥ ४९ ॥ तंव सकळांत चातुर्यमराळी । शिव लतिका हिमनगबाली । काय बोलतसे तयेवेळीं । सर्वां आगळी होवोनी ॥ ५० ॥ पिता याचा मुनि अत्रय । आणि हेहीं जन्मलें गणत्रय । तरी नाम ठेविजे दत्तात्रेय । सुहास्य प्रेय वदनीं हा ॥ ५१ ॥ अनसूया म्हणे होतें मनीं । तेंचि तुम्हीं काढिलें शोधोनी । आतां याचीं नामें करोनी । गीत गावोनी हालवावें ॥ ५२ ॥ सावित्री म्हणे नेटकें । धुंडोनी नाम कालिकें अंबिकें । येचीं नामें कौतुकें । गीत अलोलिकें गाईजे ॥ ५३ ॥ सकळ म्हणती आम्हां मानलें । नाम युक्तचि शोधलें । पालख गातां आठविलें । पाहिजे भले सकळांनीं ॥ ५४ ॥ रमा म्हणे

सकळां चित्तीं। वागलें तरी गावें गीतीं। आतां भाषणें सारा परतीं। गीत चित्तीं आठवा ॥ ५५ ॥

## ॥ पाळणा ॥

तामस तापसा। तपराशी। करितां श्रमी गा होसी। तारक उपदेशा। अविनाशी। प्रगट तूं झालासी। जो जो जो जो रे। अवधूता। अत्रि-अनसूयासुता। निद्रा करि सखया। श्रीदत्ता। त्रिगुणरूपा आतां। जो जो० ॥ धृ० ॥ राजस तूं बाळा। सकुमारा। होसी सुज्ञ चतुरा। सृष्टि उद्भविता। भ्रमघोरा। पावसि निज घे वरा। जो०॥ २ ॥ सत्व धीरा तूं। सात्वीका। त्रिभुवन जीव पालका। मायातीता गा। चालका। निजजनसुखदायका। जो जो० ॥ ३ ॥ रजोगुणा तूं। उद्भविता। कर्मासी स्थापीता। पालक सत्वा तूं। जिवदाता। तमरूपें करिशी शांता। जो जो० ॥ ४ ॥ रज तम सत्व हें। त्रिगुण। मुर्सी मुसावोन। षड्भुज प्रगटला। पावन। त्रिमुखषण्नयन। जो जो० ॥ ५ ॥ पालख लांबविला। नगशिखरीं। बाळा निजभीतरीं। खेळणें अनंत। सुतदोरी। हिंदोळा घे वरी। जो जो जो जो रे० ॥ ६ ॥

२

जो जो जो जो रे परात्परा। भजकांच्या माहेरा ॥ धृ० ॥ सह्याद्रीवरी जो अत्रिसुत। अनसूया जठरांत। प्रगटुनि विख्यात। हो दत्त। तारिल जो निजभक्त। जय जगदुद्धारा। उदारा। भजकांच्या माहेरा। जो जो० ॥ १ ॥ प्रल्हादा देशी विज्ञान। येतां अर्जुन शरण। सिद्धी देऊन। उद्धरुन। स्वपदीं देशी स्थान। अलर्क यदुतारा। योगिवरा। भजकांच्या माहेरा। जो जो जो जो रे० ॥ २ ॥

३

जो जो रे जो जो। जयविश्वात्मन्। परावर भूमन्। जय जय जय भगवन् ॥ धृ० ॥ चारभूत खाणी पाळणा। बांधोनि। चोवीस तत्वें दृढतर ओंवोनी ॥ १ ॥ गुणसूत्रें माया। स्तंभीं बांधूनिया। कर्मदोरी भरुनी। झोकें घेसी वाया ॥ २ ॥ चाळाचाळी टाकुनी। श्रुतिगीत ऐकोनि। घे झोंप उन्मनी। स्वानुभवें करुनी ॥ ३ ॥

# श्रीदत्तात्रय-जन्म.

ऐका दत्तात्रय आख्यान । पार्वतीस सांगे त्रिलोचन । सकळ पतिव्रता-माजीं पूर्ण । अनुसया जाण पतिव्रता ॥ १ ॥ ऐकोनी शिवाची वाणी । गदगदां हांसे भवानी । आम्हां तीघींवरती त्रिभुवनीं । श्रेष्ठ कोणी असेना ॥२॥ गर्व देखोनी पार्वतिचा । बोले त्रिलोचन तेव्हां वाचा । नारद सांगेल महिमा तिचा । तेव्हां तुज कळेल ॥ ३ ॥ ऐकोनी पार्वती मनांत । नारदाची मार्गप्रतिक्षा करीत । तव तो मुनी अकस्मात् । पावला तेथें ते क्षणीं ॥ ४ ॥ देखोनियां नारद मुनि । शोडपोचारें पूजीं भवानी । आम्हां तिघींवरती त्रिभुवनीं । आणिक कोणी असेना ॥ ५ ॥ ऐकोनी हांसला नारदमुनी । ऐके पार्वती चित्त देउनी । अनुसूया अत्रीपत्नी । तुम्हां तिघीं हुनि पतिव्रता ॥ ६ ॥ तुम्हां तिघींचें पुतळे करुनी । बांधिले असे वामन-चरणीं । असंख्य सामर्थ्य त्रिभुवनीं । समतुल्य कोणी असेना ॥ ७ ॥ तों पार्वती झाली चिंताग्रस्त । नारदातें उपाय पुसत । तो म्हणे प्रार्थी विश्वनाथ । तो तेथवरी जाईल ॥ ८ ॥ नग्न होऊनि घालीं भिक्षा भोजन । तेणें होईल तिचें छळण । ब्रिदें तुमचे देईल सोडून । मग गर्व सहजची गळेल ॥ ९ ॥ पार्वतीसी ऐसें सांगोनी । स्वयें वैकुंठासी येत तत्क्षणीं । देखोनी लक्ष्मी संतुष्ट मनीं । मग पूजी आदरें तयातें ॥ १० ॥ कर जोडोनी करी विनंती । कांहीं नवल सांगा स्थिती । मागे झाली जे रिती । वदला प्रती विनोदें ॥ ११ ॥ म्हणे धन्य अनुसया पतिव्रता । तुम्हां तिघींहुनी समर्था । तुमचे पुतळे तत्त्वतां । तिनें तोडरीं बांधिलें ॥ १२ ॥ ऐकोनी तटस्थ झाली रमा । आतां काय करूं पुरुषोत्तमा । मजहुनी वाढ ऐसी सीमा । ते कैसेनी निरसेल । नारद म्हणे उपाय एक । तेथें पाठवा वैकुंठ-नायक । नग्न भोजन मागा तें देख । तेणें ते छळेल ॥ १४ ॥ सांगोनी ऐसा वृत्तांत । सत्य लोकांसी गेला ब्रह्मसुत । सावित्री पुसे त्वरित । कांहीं अपूर्व वर्तलें ॥ १५ ॥ मग तो म्हणे सावित्रीसी । अनुसूया ऐसी गुणराशी । सामर्थ्य अधिक तियेपाशीं । पदा तिघींसी बांधिलें ॥ १६ ॥ सावित्री म्हणे नारदाप्रतें । कैसा उपाय करावा तीतें । जेणें भंगेल गर्वातें । शरण आम्हांतें येईल ॥ १७ ॥ पाहतां आम्हापासूनि

उत्पत्ति। एवढी काय तिची स्थिती । टिटवी काय समुद्राप्रती। शोषूं शके ॥ १८ ॥ आम्हाहूनि काय वाड । ऐसें पीडिलें महागूढ। आतां उपाय सांगा दृढ। जेणें गर्व भंगेल तिचा ॥ १९ ॥ मग ती म्हणे नारदासी। काय करावा तिशीं। तंव तो म्हणे सावित्रीशीं ऐक तुजसी सांगेन ॥ २० ॥ प्रार्थुनिया चतुरानना। पाठवावें अत्रिभुवना। जाये तूं आतां याच क्षणां। अवश्य वचन बोलवी। म्हणावें दे नग्न भोजन। तेणें होईल तिचें छळण। मग यावें सत्व घेऊन। ब्रीद जाण तुटेल ॥ २२ ॥ ऐसा नारद सांगून गेला । मग तिघी प्रार्थिती तिघांला । श्रुत करोनि नारद गेला। म्हणवूनि विनाविती ॥ २३ ॥ ऐकुनी ऐसें वचनी। तिघे निघाले तत्क्षणीं। स्त्रियांची करुणा देखुनी मनी। कृपा झाली तयांची ॥ २४ ॥ मग पवनवेगें ते अवसरीं। तिघे प्रवेशले आश्रमाभीतरीं। वाहनें ठेवूनिया दूरी। माध्यानकाळीं पै आले। मग तंव ते म्हणती तिघेजण । आम्हांस घेणें अनसूयादर्शन। ऋषीनें आज्ञा करून। दारा बाहेर पाठविली ॥ २६ ॥ तें देखोनी अत्रिऋषीनें तिघांचे केलें सांग पूजन । मग म्हणे येणें काय कारणें। आवश्यक पैं झालें ॥ २७ ॥ तंव द्वारा बाहेर तिन्ही मूर्ति। ब्रह्मा शीव कमळापती। नमस्कार झालीया पुसती । काय आज्ञा तें सांगिजे ॥ २८ ॥ ते म्हणे अनुसूयेसी । तूं पतिव्रतेमाजी श्रेष्ठ म्हणविसी। तरी मागतों तें देई आम्हांसी। म्हणोनि भीकेसी गोंविलें ॥ २९ ॥ मग म्हणती तयांप्रती। तुमचें देणें त्रिजगतीं। आणि तुम्हीं मागतां मजप्रती। इच्छा जैशी मागिजे ॥ ३० ॥ देव म्हणती होऊनि नग्न आम्हांशीं घालावें भोजन। अनुसूया अवश्य म्हणे। मग काय करिती जाहली ॥ ३१ ॥ ठेवूनिया तिघांचे मस्तकीं कर। तंव ते तिघे झाले कुमर। मग नग्न। होऊनि सत्वर। करवी स्तनपान तयातें ॥ ३२ ॥ करुनि तयांची उदरतृप्ती। वसन नेसली शीघ्रगती। मग घालूनी पालखीप्रति। गाती झाली तेधवां ॥ ३३ ॥ मग म्हणे चतुरानना। जो जो जो जो रे सगुणा। उत्पन्न करुनि त्रिभुवना। बहु श्रम पावलासी ॥ ३४ ॥ या कारणें केलें बाळ। आतां राहिलें कर्तृत्व सकळ। स्तनपान करोनि निर्मळ। सुखें निद्रा करावी ॥ ३५ ॥ जो जो जो जो रे लक्ष्मीपती। तुझी तव अगाध कीर्ति। अवतार धरुनि पंक्ति। दुष्ट संहार पै केला ॥ ३६ ॥ ते श्रम पावलासी

थोर। निद्रा करावी बा सत्वर। म्हणोनि केला कुमर। विश्रांती सुख पावावया॥ ३७॥ जो जो जो जो रे बा शंकरा। महादेवा पार्वतीवरा। करोनि दुष्ट संहारा। बहु श्रम पावलासी॥ ३८॥ तरी आतां सुखें निद्रा करी। कुमारकत्व पावले यापरी। आतां क्लेश नाहीं तरी। पालखीभीतरीं पहुडावें॥ ३९॥ आसे आखंद स्तनपान। पालखीत निजवी बाळकें पूर्ण। नित्य गीत-गायन। भक्ती ज्ञान वैराग्य॥ ४०॥ ऐसे गेले बहुत दिवस। मार्ग नाहीं जावयास। न सुटे बाळपणाचा वेश। सामर्थ्य विशेष अनुसूयेचें॥ ४१॥ उमा रमा सावित्रीतें। थोर गर्व होतां तिघीतें। तो निरसावयातें। विंदान केलें नारदें॥ ४२॥ मागुती सांगे तिघीप्रती। काय निश्चित बैसल्याती। बालकें करुनि तिघांप्रती। अनुसूया सती खेळवितसे॥ ४३॥ नित्य करवी स्तनपान षण्मासांचें बाळें करुन। पाळण्यामाजी निजवून। गीत गायन करीतसे॥ ४४॥ पहातां ऋषीपत्नी जाण। तिचें तुळणे न पुरे त्रिभुवन। आतां जाणे शरण तियेसी॥ ४५॥ तंव त्या तिघीजणी बोलती। आम्ही तरी आदिशक्ती। आमुचे सामर्थ्य त्रिजगतीं। प्राणी वर्तती एकसरें ४६॥ सुरनर गंधर्व किन्नर। पशुपक्षी अपार आमुच्या सामर्थ्या थोर। चराचर नांदत॥ ४७॥ तरी आमचे आम्हीच पती। सोडवूं आपले सामर्थी। अनुसूया ते बापुडी किती। काय तिची कीर्ति आपुल्यापुढें॥ ४८॥ ऐसे बोलोनी अभिमानी। तिघी निघाल्या ते क्षणीं। लगबग आल्या धांवुनी। अनुसुया-भुवनीं तत्काळ॥ ४९॥ ते देखोनिया ऋषीश्वरे। तिघी पूजिल्या षोडशोपचारें। काय आज्ञा पुसे त्वरें। ते प्रत्योत्तरें सांगीजे॥ ५०॥ त्या तिघीजणी बोलती। पाठवावे अनुसूयाप्रती। येरें आज्ञा करुनी शीघ्रगती। स्त्रियांप्रती आणाविले॥ ५१॥ तंव ते पातलीसे त्वरें। केला तिघींसी नमस्कार। आज्ञा पुसे सत्वर। भाग्य थोर आलेती॥५२॥ तिघी म्हणती आमुचे पती! आणून देई शीघ्रगती। तंव त्या बाळकाच्या मूर्ती। पुढे क्षीतीं ठेविल्या॥ ५३॥ तंव ते सारखे बाळ तिन्ही। बोलूं नेणती वचनीं। तिघी चकीत झाल्या मनीं। परि कोण्हा न लक्षवेना॥ ५४॥ सर्वही सामर्थ्य वेंचलें। अभिमान धैर्य गळालें। पण लोटांगण घातलें। चरण वंदिलें सतीचे॥ ५५॥ अनुसूया थोर तूं पतिव्रता। धन्य धन्य तुझी सामर्थ्यता। आम्ही लीन जाहलों पहातां। नको निष्ठुरता करूं माये॥ ५६॥ जैसे होते आमुचे पती। तैसे

करावे पुढती । अगाध धन्य तुझी कीर्ति । पूर्ण सती पतिव्रता ॥ ५७ ॥ ऐकोनी सतीत्रयींचें वचन । तिघांचें मस्तकीं स्पर्शे करून । कृपायुक्त अवलोकून । पूर्व चर्या ते आणिले ॥ ५८ ॥ तिघांचीं स्वरूपें जैसी होतीं । तैशा केल्या तिन्हीं मूर्ति । देव अंतरिक्ष कौतुक पहाती । वृष्टी करिती पुष्पांची ॥ ५९ ॥ दुंदुभि वाजविल्या भेरी । आनंद झाला सर्वांतरी । बोलिले सत्वरीं । अनुसूया पतिव्रता ॥ ६० ॥ त्रय देव म्हणती धन्य माते । आगाध सामर्थ्य तुझें सत्य । प्रसन्न झालों मागा वरातें । मनोरथ पूर्ण करा हो ॥ ६१ ॥ मग ते बोले करुणावचन । अपूर्व तुमचें दर्शन । भावें न गमे तुम्हांविण । अर्धक्षण जाणिजे ॥ ६२ ॥ तरी तिघे रूप असावें । एवढें मज वरदान द्यावें । आणीक नलगे स्वभावें । म्हणोनी भावें प्रार्थितसें ॥ ६३ ॥ मग देवत्रयाची मूर्ति । करकमळीं जाली शीघ्रगती । दत्तात्रय नामें ऐसी ख्याती । तिहीं लोकांप्रती विशेष ॥ ६४ ॥ वर देऊनी गेला स्वस्थाना । शक्तीसहीत आरूढले वाहना । सर्व देव समुदाव जाणा । स्वर्ग भुवना पातले ॥ ६५ ॥ येरीकडे दत्तात्रय मूर्ति । बालरूपें अनुसूये प्रती । पुढें व्रतबंध झाले निश्चितीं । अभ्यासिल्या सकळ कला ॥ ६६ ॥ एका जनार्दन म्हणे । दत्तात्रय जन्मकथन । भावें करितां श्रवण । मनोरथ पूर्ण श्रोतियांचे ॥ ६७ ॥

---

## श्रीदत्तात्रयाचे खेळ

नानापरिचे खेळ खेळती । भ्रमतां वृक्षतळीं बैसती ॥ बहु चमत्कारें अनुवादिती ॥ जेथें उपरति होय जीवा ॥ १६ ॥ माईक प्रवृत्ती खेळ । ते निवृत्ति करोनि घालिती मेळ ॥ आम्हीं ऐक्य सकळ । ऐसें तात्काळ दाविती ॥ १७ ॥ गली खाणोनि गोट्या खेळती । दोहीकडे दोघे असती । एक कच्यावरी गोटी मांडिती । एक भेदिती चमत्कारें ॥ १८ ॥ निःशक्त युक्तीनें खेळती खेळ ॥ गली गली भेदिती सकळ । विसावे घेत वालविती मेळ ॥ कच्चा तात्काळ उडविती ॥ १९ ॥ गल्ली कच्चा चुकतां ॥ पुनरा फिरे तो मागुता । डाब बैसला तया माथा ॥ भोगिती व्यथा बहू फार २० खेळिया माजी दत्तथोर । कचीं कचा भेदिती पार । टिचोनि गोटी होय

वर । येरा आवर न घडे तो ॥ २१ ॥ अभ्यासी बोटें करोनि लवतें ॥ संधान द्विदळीं साधी पुरतें । चुकवोनिया गलींतें । लक्षी अलक्षातें टिचीद्ध ॥२२॥ कोणी रंगण गोटी खेळती ॥ पायता राहोनि नेमिती॥ आलाद टिचणीं चुकती ॥ रंगणी पडती गुंतोनी ॥ २३ ॥ गुंततां घरविती काना । चुकतां लवविती माना ॥ आपुली काढितां आपणा । दुःख नाना भोगाविती ॥ २४ ॥ तोचि खेळिया धुरंधर । पायता राहोनी लक्षी सुंदर । गोडीनें गोडी सत्वर । भेदोनि पार निराळा ॥ २५ ॥ तेवींच आस्यापास्या खेळती । घरांत जावोनी नातळती ॥ मारा चुकवोनी घरें घेती ॥ लोण शिवती अचूक २६ ॥ कोणी गल्लीं सांपडले । अज्ञान भ्रमें भ्रमित झाले ॥ पाटि रक्षकें ताडिले ॥ डाव बैसले मस्तकीं ॥ २७ ॥ कोणी युक्तीनें रिघती । हुल दाखवोनि घरें घेती । नाना हाव भावातें दाखाविती । परी लक्षितो लोण जीवें ॥ २८ ॥ कोणी एक दोन तीन घरें पावले । रक्षक सर्वां घरीं असती ठेले ॥ तेणें आतळतांचीं फेरीं पडले ॥ डाव आले अंगावरी ॥ २९ ॥ तोची शहाणा चतुर पुरता ॥ खेळीं हावभाव दावी फिरता । अचुक न लागे कव-णाचिया हाता । लोण शिवतां मुक्त तो ॥ ३० ॥ आतां तिमरा खेळ मांडू । म्हणाल कोणती विटी दांडू । खेळता येर येरावीं भांडू । कवडी ब्रह्मांड फिरवूं या ॥ ३१ ॥ गडी सम सारखे एक । द्विविधो दावावया कौतुक । एक कोलक आणि झेलक । उभे साम्यक ठाकले ॥ ३२ ॥ विटी दांडू जीव शीव । माया गल्ली हे अनेक ठाण । करविता जो खेळ लाघव । व्यापक स्वयमेव वेगळा ॥ ३३ ॥ दांडू राहे ठाईंचा ठाईं । विटी माथा टोले खाई । यतांची झेलो जो लवलाहीं । तोची भाई समतुल्य ॥ ३४ ॥ विटी न गवे झेलितां । दांडू तरी भेदावा पुरता । तो हा जरी चुकोनी जातां । डाव माथा चढूं लागे ॥३५॥ उभयासी समसंधान ॥ डाव खेळतां।असती जाण । एकमेकांची चुकी लक्षोन । वराधिक्यपण करावें ॥३६॥ न येतां हातीं चुका । खिलाडी खेळे जरी नेटका ।मग करावा लागे लेखा। कारण तुका न तुकवे॥३७॥ मग सातांचे आवर्ण । तेंही जाणा वेगळीच खूण । वकाटाचें चरणस्थान । चुकतां पतन सहज त्या ॥ ३८ ॥ लेंडकरवी भ्रमणा । चुकेजरी वर्मस्थाना। मग खेळीं होय स्वस्थापना । चुकपणाडाव आला ॥ ३९ ॥ दंडस्थापना बैसे मुंड । चुकतां झेलिता मोठें बंड । न चुकतां कुभांड। आणिक विवंड बा-

दवी ॥ ४० ॥ खेळा खेलाडीं खेळेनाळ । ताडणीं तया झेलाल । तईंच सोडोनिया झाल । पुढें कराल उभे तया ॥ ४१ ॥ नालनलगेची हातीं । तरी आर झोंबे पुढती नेत्रासनीं ऊर्ध्वगती । जाणा स्थिती तयाची ॥ ४२ ॥ तेथें जरी चुकोनि जाये । मग तो डाव हातासी ये । तोची ताडितां जरी होय । झेलितां अपाये हारती ॥ ४३ ॥ झेलणीं नये झेलितां । मग वैद धांवे पुढता । तो कर्णींच सांगे वार्ता । तया स्वीकारितां उत्तम ॥ ४४ ॥ तोही हातींचा जरी गेला । मग झकू उरावरी बैसला । दहा झकूंचा होतां मेळा । जुंपी कावडीला सकळांतें ॥ ४५ ॥ दैवें खेळ येतां हातीं । तरी समपाडें करावें फेंडीसी । आधीक होतां होतां खेळासी । ठाव निश्चयेसी ठाईंच ॥ ४६ ॥ न फिटे अधिक झाले । तरी भोगणें कावड प्राप्त आलें । विटी झेलितां दम पुरलें । गडी भागले कितिक पै ॥ ४७ ॥ सरतां खेळ पडे विटी । मग खिलाडा डावकऱ्यासी पीटी । कवडी कवडी वेंचवी होटीं । दमसुटी व्यर्थ गेला ॥ ४८ ॥ तेथें दमें जरी धरिल धीर । नाद उठवी एक सूर । मूळस्थानीं जावोनि सत्वर । साही प्रखर रेशाकरी ॥ ४९ ॥ मुळासी गेल्यावाचून । भागा नये मुक्त पण । यासाठीं खेळावे जपून । झकू लाऊन न घ्यावा ॥ ५० ॥ पुढती खेळ आरंभिती । सप्तपर्व लीगूरिसि रचीती । तयावरी ती मोने मांडिती । समभाग होती गडी तेव्हां ॥ ५१ ॥ चेंडू करी बोलती बोल । सावध गड्या चेंडू झेल । लिगोरी उडवोनी सकळ । घेईन दुमाल गड्याचा ॥ ५२ ॥ गडिये व्हारे सावधान । डाव घेऊं चेंडू झेलून । मांडिली चक्रें हीं भेदून । डाव आपण जिंकूं पै ॥ ५३ ॥ संधान साधोनि उडवी । लिगोरी त्याचा पाठलाग वेगीं करी । खिलाडें चुकवोनी पहिल्या परी । रची निर्धारी तो धन्य ॥ ५४ ॥ भेदोनिया उभारणें । चेंडू झेलोनी सरसें होणें । टोला पाठीचा चुकविणें । युक्त लक्षणें खेळ हा ॥ ५५ ॥ सद्गुरु दत्त खेळे खेळां । वचन चेंडू भलतैसा फेकिला । तो वरचेवरी जेणें झेलिला । तोचि पावला स्वात्मसुखा ॥ ५६ ॥ अहंकार लोभ चेंडू उसळतां । तयासि पिठवोनी हाणिजे लाता । कदा राहूं नेच लाताळितां । बैसे चुकतां पाठींत ॥ ५७ ॥ तेणें लागपाठ केला जरी । तो फिरवीत गा बहुत फेरी । उसंत नेदीच क्षणभरी । न मिळे निर्धारि विश्रांत ॥ ५८ ॥ या साठीं लोभ अहंकार ।

पठण ८२८९

यासी लाताळावें वारंवार । विवेकें करावा जर्जर । त्याचा भर मोडावा ॥ ५९ ॥
दत्त म्हणे ते समर्थी । आपण खेळूं लपंडाकी । दुर्वास म्हणे भले भाई ।
लपतों पाहीं घरीं आम्हां ॥ ६० ॥ तंव त्या पर्वताचें दरीं । लपूं ठाव
बांधिला पोरीं । अवधूत व्यापक सर्वांतरीं । आणिली सारी घरोनी ॥ ६१ ॥
भोग्यासी जंव नाहीं शिवले । तैसिया माजी आवरिले । डाव सकळां वरी
आणिले । काय बोले तयांसी ॥ ६२ ॥ आतां आली तुमची पाळी । डोळे
झांकिजे त्वरें सकळीं । मी लपतों कवणिया स्थळीं । काढा ये वेळीं
धुंडोन ॥ ६३ ॥ अवश्य म्हणोनी डोळे झांकिती । गुप्त झाली दत्त मूर्ति ।
सकळ पोरें धुंडों जाती । बहु शोभती पर्वता ॥ ६४ ॥ वृक्ष पाषाण
दरीं खोरां । गुहागृहें शोधिलें मंदीरा । स्थूल सूक्ष्म स्वापद
थारा । शोधिती घरा बहुतची ॥ ६५ ॥ ठाव न लगेची तयासी । श्रम
पावले मानसीं । विचारिते झाले एकमेकासी । गती कैसी करावी ॥ ६६ ॥
अर्भकें सकळही अज्ञान । करिते झाले तेव्हां रुदन । अहो गती झाली तरी
कवण । आलें दूषण सर्वांवरी ॥ ६७ ॥ कळतां मारील बापभाय । ऐसि-
यासी करावें काय । पडिले संकटीं न सूचे उपाय । मोकलिती धाय तेधवां
॥ ६८ ॥ जवळीच असतां रत्न । न दिसे तें अंधा लागून । बधिरा लागीं
कीर्तन । नव्हेची श्रवण कदापि ॥ ६९ ॥ तैसा या अज्ञानासी । केंवी
सांपडे तो अविनाशी । व्यापक असोनि न कळे कोणासी । काय अंधासी
म्हणावें ॥ ७० ॥ असो ज्याचा जैसा भक्तिभाव । तैसा त्या पाशीं वसे
देव । मुलांचा आक्रोश देखोनी धांव । दत्तराव घालीतसे ॥ ७१ ॥ एका
एकीं प्रकट झाला । मुलें म्हणती कोठोनि आला । तूं कोठें तरी लपाला ।
सांग ये वेळां आम्हांसी ॥ ७२ ॥ म्हणे मी होतों तुमच्चेच पाशीं । परी
तुम्ही नचि पहा कीं मजसी । उगेचि पावलां श्रमासी । दुःख मानसीं
भोगिलें ॥ ७३ ॥ दत्त म्हणे तुम्हीं लपावें । आम्हीं शोधितों तुम्हां बरवें ।
तंव दुर्वास बोले अघवे । कोणें पावावें तुझिया सरी ॥ ७४ ॥ आम्ही जेथें
जेथें लपूं जातां । तेथें तूं अससी दत्ता । तुजवीण ठाव रिता । कोठें पहातां
न राहे ॥ ७५ ॥ जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं । सजीव निर्जिवीं राहिलासी
व्यापोनी । आम्हां लपावया लागोनी । ठाव तुज वाचोनी दिसेना ॥ ७६ ॥
ऐसे ऐकतां गुज । संतोषला महाराज । नाना खेळांचें चोज । दत्तराज दावी

मला ॥ ७७ ॥ म्हणे बापहो ऐसें खेळावें । खेळोनी डावी न गुंतावें । हार्ती कोणाचेही न यावें । असक्त असावें खेळतां ॥ ७८ ॥

## दिनचर्या

१

सिद्ध मुनी ऋषी देव । दर्शना येसी अप्सरा गंधर्व । ते वंदोनी जाती सर्व । जयां गर्व न ठावा ॥ ७७ ॥ सह्याद्रीवासी मुनी । तेही जाती वंदूनी । मृत्तिका जल घेवूनी । आला मुनी शांततपा ॥ ७८ ॥ मग श्रीदत्त उठोन । करीं मृजल घेऊन । नैऋती दिशे जाऊन । मलोत्सर्ग करूनी पातला ॥ ७९ ॥ मृज्जल समिधा घेऊनी । तंव आला दुसरा मुनी । श्रीदत्तें शौच करुनी । दंतधावन पैं केलें ॥ ८० ॥ सरोवरीं केलें स्नान । केलें देवर्षिपितृतर्पण । तंव एक मुनी येऊन । भस्म वल्कल देतसे ॥ ८१ ॥ करुनि त्रिपुंड्र धारण । वल्कल तें पांघरूण । करूनी संध्यावंदन । पुनः ध्यान आरंभिलें ॥ ८२ ॥ राजा मनीं झाला खिन्न । उभा राहे हात जोडून । मग शांततपा बोले वचन । नमन करून गुरूतें ॥ ८३ ॥ भगवन् हा तुमचा दास । उभा राहे करून उपवास । यानें आपुली धरली कास । यास उदास न करावा ॥ ८४ ॥ हा करी भक्ती बरवी । याची उपेक्षा न करावी । कृपादृष्टी यावरी करावी । हा भाविक ठावा असेल ॥ ८५ ॥ हंसोनी बोले श्रीदत्त । काय इच्छितें याचें चित्त । आणिक इच्छी जरी वित्त । तरी देतो सत्वर ॥८६॥

२

कौपीनादिक टाकून । स्मशानीं जावूनि बैसे नग्न । ना साग्रदृष्टि ध्याननिमग्न । यत्पदसंगलग्न होती योगी ॥ ९१ ॥ पिंगल याग आणि साध्यदेव । रूप पाहतां अपूर्व । प्रश्न करिती सगर्व । पाहूनी सर्वमूर्ती ते ॥ ९२ ॥ त्यातें सदुपदेश करून । दिधलें योगपूर्वक ज्ञान । त्या दिवसापासून । प्रसिद्धि झाली श्रीदत्ताची ॥ ९३ ॥ दुष्ट शिक्षक शिष्ट पाळक । योग मार्गाव प्रवर्तक । जाणूनि येती मुनी बाळक । विश्वपाळक काय करी ॥ ९४ ॥ तत्परीक्षार्थ त्या वेळीं । श्रीदत्त बुडे अगाध जळीं । भिवोनि पळती त्या काळीं । कित्येक मंडळी सत्वर ॥ ९५ ॥ तो मानूनि खेळ । तेथें राहिले कित्येक बाळ । त्यांची परीक्षा करावया केवळ । भलता खेळ आरंभी ॥ ९६॥

एक नग्न स्त्री घेऊन । श्रीदत्त तीरीं येवून । स्वयें नग्न होऊन । क्रीडा करूनि राहिला ॥ ९७ ॥ स्वाश्रया जी स्वविषया । नारी झाली ती आदिमाया । ती अंकीं बैसोनिया । वाद्यें वाजवोनिया गातसे ॥ ९८ ॥ तीतें करवोनियां पान । शक्तीचें उच्छिष्ट घेई आपण । तिला देई वीर चर्वण । बाळ पाहोनी पळाले ॥ ९९ ॥ तेजीयसां नाहीं दोष । म्हणोनी राहिले जे शेष । त्यांवरी करुनि तोष । योग सविशेष सांगितला ॥ १०० ॥ ईश्वर करी साहस । धर्म व्यतिक्रम खास । तेजीयसत्वामुळें नाहीं दोष । अग्नि निर्दोष व्यापारी ॥१०१॥

३

दूरीं देखतां गुरुवर । पायीं चालोनि ये इन्द्र । करी भावें नमस्कार । परमादर करुनी ॥ ६ ॥ गुरु बैसवी तयासी । तो बैसोनी देखे शिष्यांसी । झटले शास्त्राभ्यासीं । अन्य मानसी न आणिती ॥ ७ ॥ कोणी लौकायत शास्त्र । कोणी पढती कामशास्त्र । कोणी शिल्प सौगतशास्त्र । न्यायशास्त्र कोणी पढती ॥ ८ ॥ तें ऐकोनि इंन्द्र पुसे । म्हणे गुरो काय हें असे । आपण पढवितां कसें । बंध येतसे ज्यायोगें ॥ ९ ॥ उपजतांची पूर्वाभ्यासें । विषयवासना होतसे । ती कामादि शास्त्राभ्यासें । बुडवितसे ठार नरकीं ॥ १० ॥ आधींच उल्हास । त्यांत पातला फाल्गुन मास । तसें क्षुद्रशास्त्रें ह्यास । विषय ध्यास होईल ॥ ११ ॥ हे होत विषयक्रांत । दुःशास्त्रीं करितां आसक्त । जेवीं अंधाकूपांत । लोटावें तसें हें वाटे ॥ १२ ॥ मुळीं हे कामुक । ही शास्त्रें अर्थात्मक । गुरु म्हणे इन्द्रा ऐक । मनीं कौतुक न मानी ॥ १३ ॥ शास्त्रें न होतीं बाधक । सर्वांचें तात्पर्य एक । सात गाथा सांगतों ऐक । मन निःशंक होईल ॥ १४ ॥

## ॥ श्रीदत्त-संचार ॥

ज्याचें नित्य गङ्गास्नान । माहुरीं करी शयन । सह्याद्रीवरी आसन । करी ध्यान गाणगापुरीं ॥८३॥ कुरुक्षेत्रीं आचमन । धोपेश्वरीं जाऊन । करी जो भस्मधारण । संध्यावंदन कऱ्हाडीं ॥८४॥ कोल्हापुरीं भिक्षाटन । पांचाळेश्वरीं जाऊन । नित्य करी भोजन । विचित्राचरण जयाचें ॥ ८५ ॥ पंढरपुरीं जाऊन । नित्य सुगंध लेऊन । पश्चिम सागरीं येऊन । करी अर्घ्यदान सायंकाळीं ॥ ८६ ॥ जो जो करील स्मरण । त्या त्या देई दर्शन । व्यापिलें जेणें त्रिभुवन । असो नमन तच्चरणा ॥ ८७ ॥

# श्रीवासुदेवानंदसरस्वतीविरचित श्रीदत्तमाहात्म्य

## अवतरणिका.

जें निर्विकल्प परब्रह्म । तेंच परंधाम । तें कळावया सगुणब्रह्म । कथिलें दीपक वेदधर्म संवादें ॥ १ ॥ हा पांच हजार चारशें ग्रंथ । पन्नास अध्याय केले येथ । भक्तिज्ञान वैराग्य येथ । स्पष्ट यथार्थ वर्णिलें ॥ २ ॥ अनुक्रमेंकरून । ज्या अध्यायांत जें कथन । तें संक्षेपेंकरून । आतां निरूपण करूं येथ ॥ ३ ॥ स्वयमेव केलें मंगळाचरण । नवविध भक्तींचें वर्णन । सांगितलें क्रमेंकरून । सृष्टिक्रमण संक्षिप्त ॥ ४ ॥ दत्तात्रेयांचे मायबाप । त्यांचें गुणस्वरूप । गुरुशिष्यकथेचा संक्षेप । प्रथमाध्यायीं जाणावें ॥ ५ ॥ बहुधा केले दीपकें प्रश्न । वेदधर्मा हर्षून । पितृपुत्रसंवाद सांगून । कौशिकाख्यान कथन करी ॥ ६ ॥ शापूनि सूर्या ठेवी सती । अनसूयेसी देव स्तविती । अनसूया ये सतीप्रती । द्वितीयाध्यायीं ही कथा ॥ ७ ॥ सूर्योदय करवितां । कौशिका मृत्यू येतां । अनसूया करी जिता । स्तविती देवता अनसूयेसी ॥ ८ ॥ वसुधेश्वरें मांडव्या सोडिला । त्रिमूर्ति दत्त अवतरला । नानापरी करी लीला । तृतीयाध्यायीं हे कथा ॥ ९ ॥ व्हावा परमोत्कृष्ट सुत । म्हणून भानुसप्तमीव्रत । कथिलें अनंतव्रत । कार्तवीर्यार्जुन जन्मला ॥ १० ॥ गर्गें दंडनीति ऐकवून । दत्तमाहात्म्य सांगून । पळविलें अर्जुनाचें मन । हे कथा चवथ्यांत ॥ ११ ॥ भूपाळ सांगे गर्गमुनी । देव जिंकिले दैत्यांनीं । ते दत्तापाशीं येवूनी । सेवा करूनी राहिले ॥ १२ ॥ दैत्यां मूढ करून । देवांहातीं मारून । स्वर्गीं पाठविले देवगण । पंचमाध्यायीं हे कथा ॥ १३ ॥ समूळ होवूनी भक्तिरसें । दत्ता अर्जुन भेटतसे । दत्त बीभत्सरूप दावीतसे । न विटतसे अर्जुन ॥ १४ ॥ दत्तें मनोरथ पुरवितां । अर्जुन बसे गादीवरता । त्याच्या राज्याची व्यवस्था । षष्ठाध्यायीं वर्णिली ॥ १५ ॥ स्वास्थ्य विषयांचें जाणून । अर्जुन विरक्त होवून । दत्तापाशीं येवून । करी स्तवन नानापरी ॥ १६ ॥ त्या नृपांतःकरणा पारखून । दत्त दे आश्वासन । मग नृप करी प्रश्न । कथन हें सप्तमाध्यायीं ॥ १७ ॥ गुरु-सुरेंद्र-संवाद । सात गाथेचा अनुवाद । शिल्पज्ञकथा विशद । जन्मांतर तयाचें ॥ १८ ॥ एक रेवातटस्थ ब्राह्मण । कामशास्त्रप्रवीण । तो अनुक्रमें घे निर्वाण । अष्टमाध्यायीं हे कथा ॥ १९ ॥ गायत्रीजापक सुशीलास । पीडिती सात राक्षस । श्रीदत्त भेटोनी त्यांस

मंत्र देवूनी घालवी ॥२०॥ प्रामाणिक विष्णुदत्त । भूतें तया दाविला दत्त। दत्त तया मुक्त करीत । नवमाध्यायीं हे कथा ॥ २१ ॥ जो उपजल्यापासून । रोगें ग्रासिला ब्राह्मण । कर्मविपाक सांगून । त्या दे जीवन विष्णुदत्त ॥२२॥ फल दावूनी औषध पाजिलें । झोटिंगाचें बंधन केलें । शास्त्रतत्व कथिलें । दहाव्या अध्यायांत॥ २३ ॥ जीवा विविध भ्रमण। कर्मयोगेंकरून । गर्भ-वासनिरूपण । अवस्था लक्षण यथार्थ ॥ २४ ॥ पुत्र चतुर ज्ञानी असून । जड होयी भिवून । विष्णुदत्त त्या दे अश्वासन । अकरावे अध्यायीं हे कथा ॥ २५ ॥ सृष्टि–क्रम–कथन । व्यष्टि-समष्टि-लक्षण । विक्षेप आवरण । सदा-चरण गुरुसेवा ॥२६॥ त्या क्रमें श्रवण मनन । परोक्षापरोक्षें ज्ञान । जीवरूप-कथन । हें वर्णन बाराव्या अध्यायांत ॥ २७ ॥ वाक्यविवरण पूर्ण । षड्-लिंगांचें कथन । प्रत्येकाचें लक्षण । तत्वं पदार्थ लक्षणही ॥ २८ ॥ तो विष्णु आत्मा तत्पदार्थ । जीव हा त्वं पदार्थ । लक्षलें यांचें ऐक्य यथार्थ । तेरा-व्यांत असें हें ॥ २९ ॥ जें स्वर्गोपविष्ट देवांही । सुख ठावें होत नाहीं । अष्टांगयोगें तेंही । मिळे निश्चित अभ्यासें ॥ ३० ॥ हें नृपा सांगे दत्त । यमनियमासन यथार्थ । प्राणायामादिक समर्थ । चौदाव्यांत बोलिला ॥ ३१ ॥ सांगे अवधूतज्ञान सजातीय प्रत्ययलक्षण । विजातीय-निरसन । निदिध्यासन यथार्थ ॥ ३२ ॥ दत्त दावी अभ्यासमार्ग । तसा राजा करी सांग । समाधिस्थ हो अग । पंध्राव्यांत हे कथा ॥ ३३ ॥ जो अभ्यस्तयोग । त्याचें दाढर्य करी मग । दत्त म्हणे असंग । प्रारब्धभोग अर्जुना ॥ ३४ ॥ आला अर्जुन स्वनगरीं। समुद्राचा गर्व हरी । यज्ञदानादिक करी । षोडशांतरीं हे कथा ॥ ३५ ॥ नृप तो यज्ञ करी । तेणें देव भीती अंतरीं । अतिथि होवून रवि ये द्वारीं ॥ राख करी वृक्षांची ॥ ३६ ॥ राजा धर्मिष्ट असून । दैवें वशिष्ट कोपून । शाप दे हें कथन । सत्राव्या अध्यायांत ॥ ३७ ॥ स्वधर्मानें मरण । दत्तापाशीं मागे अर्जुन । ऋषीकांचें आख्यान । विधीनें लग्न सत्यवतीचें ॥३८॥ वाखाणि भाविष्य भृगुमुनी । शिव झाला जमदग्नी ।विश्वामित्र राजा झाला मुनी।अठराव्यांत हें कथा ॥३९॥ राम धाकुटा पुत्र जमदग्नीचा। अवतार विष्णूचा। निरोप मानून पित्याचा। तोडी मातेचा गळा तो ॥ ४० ॥ त्या परशुरामें ख्याती केली । रेणुकेला वांचविली। पित्याची सेवा केली । एकुणिसाव्या अध्यायीं हें ॥ ४१ ॥ देवयत् महत्व ठाविती । त्या देवांची केली स्तुती । मुनिगृहीं ये भूपती । आतिथ्य करी मुनि त्याचें ॥ ४२ ॥ राजा विधिवशें भुलून । चाले धेनूस घेवून । त्यावरी धांवे भृगुनंदन । हें कथन विसाव्यांत ॥ ४३ ॥ श्रीविष्णोः कलेयं असें

मानून । युद्ध करी अर्जुन । रामें परशु धरून । भुजं तोडून टाकिले त्याचे ॥ ४४ ॥ राम करी अर्जुनाचा नाश । पिता म्हणे दोषी त्यास । राम जाई तीर्थाटणास । एकविसाव्या अध्यायीं हें ॥ ४५ ॥ अधर्मातें स्वीकारून । जमदग्नीचा मान । तोडिती अर्जुनाचे नंदन । करी आक्रंदन रेणुका ॥ ४६ ॥ ते क्षणिं राम वनांतून । येई दुःखी होवून । करी शत्रूंचें हवन । हें निरूपण बाविसाव्यांत ॥ ४७ ॥ मग परशुराम मायबापांसी । घेवून भेटे दत्तासी । रेणुका स्तवी दत्तासी । रेणुकेसी स्तवी दत्त ॥ ४८ ॥ अवश्यक करून । रेणुका सिद्ध होवून । करी सहगमन । हें निरूपण तेविसाव्यांत ॥ ४९ ॥ तत्सुत राम करी क्रिया । पूजी दत्ताचार्या । दत्त पुनः दावी तया । मायबापांसी तें क्षणीं ॥ ५० ॥ क्षत्रियं हनन करून । राम कश्यपा दे भूदान । राहे समुद्रा-तीरीं जाऊन । हें कथन चोविसाव्यांत ॥ ५१ ॥ पुत्र तोचि सांगे पित्यासी । गालवें अश्व देवूनी ऋतध्वजासी । नेला यज्ञ रक्षणासी । पातालकेतूसी तो वेधी ॥ ५२ ॥ तो तीव्र बाणासह गेला पाताळीं । राजा मागें चाले त्या वेळीं । तया मदालसा भेटली । पंचविसाव्यांत हे कथा ॥ ५३ ॥ ती सुता गंधर्वाची । सखीकरवीं गुरूची । भेटी करवूनि भूपाची । भार्या साध्वी जाहली ॥५४॥ दैत्या निर्दाळूनि भूप ये पुरासी । कपटी फसवी मदालसेसी । तिणें देह दिला अग्नीसी । सव्वीसाव्यांत हे कथा ॥ ५५ ॥ तो नृप स्त्रीच्या विरहें । भोग सोडूनि वनीं राहे । अश्वतर नाग सुतस्नेहें । नाग तत्स्नेहें दुःखी होती ॥५६॥ दुःखास्पद सुत पाहुनि नाग । सरस्वतीवरें मग । शिव-तोषें मदालसेला अव्यंग । मिळवी हे सत्ताविसाव्यांत ॥ ५७ ॥ नृपा शेषानें पाताळीं आणून । स्ववृत्त सर्व सांगून । दे मदालसा दान । पूर्ववत् तिला पाहून नृप हर्षे ॥ ५८ ॥ दिसे इंदिरेपरी तिला । नृप घेवूनी पुरा आला । एक पुत्र तिला झाला । बोधी त्याला अठ्ठाविसाव्यांत ॥ ५९ ॥ नरेंद्र मूर्ख पुत्र जाणून । करी शोक अनुदिन । मग तया सांगे नंदन । माता हें ज्ञान दे आम्हां ॥ ६० ॥ वैरस्य तें मानून । मदालसेवरी नृप कोपून । प्रवृत्तिमार्गाचें स्तवन । करी एकुणतिसाव्यांत ॥ ६१ ॥ तें अयुक्त जरी तरी । मदालसा स्वीकारी । अलर्काला व्यवहारीं । हुषार करी नृपाज्ञेनें ॥ ६२ ॥ साम्राज्य अलर्काचें पाहून । त्यासी विरक्त करावा म्हणून । सुबाहु करी रण । हें कथन तिसाव्यांत ॥६३ तें दुःसह दुःख पाहून । करी अलर्क पलायन । मातृवचन स्मरून । भेटे येऊन श्रीदत्ता ॥ ६४॥ त्या दुःखातें वारून । अलर्का प्रबुद्ध करून । दत्त उपदेशी ज्ञान । हें कथन एकतिसाव्यांत ॥६५॥ सांगे तत्वज्ञान आत्रेय । मनोभंग वासनाक्षय । यांचे सुगमोपाय । योगिराय अलर्कातें ॥ ६६ ॥ त्या

अद्वितीयात्मक दर्शन । व्हाया अष्टांगयोगसाधन । सांगे सयुक्तिक अत्रि-नंदन । बत्तिसाव्या अध्यायीं ॥ ६७ ॥ तद्विष्णोः परमं पदं । असे सांगे जें वेद । तें कळावें विशद ॥ म्हणूनि धारणाभेद सांगे दत्त ॥ ६८ ॥ योग पदरीं पडावा म्हणून । अभ्यासाचे दोषगुण । दत्त करी निरूपण । तेत्तिसाव्या अध्यायीं ॥ ६९ ॥ सुविरक्त व्हावें म्हणून । आणिमादि सिद्धींचें वर्णन । सांगे दत्त नृपा ध्यान । सगुणागुण भेदानें ॥ ७० ॥ योग मंद न व्हावा म्हणून । दत्त सांगे योगचर्यालक्षण । भिक्षेचेंहीं वर्तन । चौतिसाव्या अध्यायीं ॥ ७१ ॥ सांगे परम योगसाधन । अनाहताचें अनुसंधान । करा-वया स्थिर मन । प्रणवध्यान सांगे दत्त॥ ७२ ॥ नृपो दंत सांगे विशद । साडेतीन मात्रांचा भेद । क्रममुक्ती पद । पस्तिसाव्या अध्यायीं ॥ ७३ ॥ भूपास सांगे दत्त । मृत्युज्ञान वर्षांचे आंत । योगी लावावया-चित्त । शीघ्र विरत व्हावया ॥ ७४ ॥ सर्वदा योग करितां । मध्येंच मृत्यु येतां । म्हणे ये क्रममुक्तता । छत्तिसाव्यांत श्रीदत्त ॥ ७५ ॥ नृप परमानंद पावून । करी दत्त-गुरूचें स्तवन । बंधूचे उपकार मानून । भक्तिरस प्रगटवी ॥ ७६ ॥ अदृश्य रूपाहून । सगुण अधिक मानून । अलर्क करी स्तवन । हें कथन सदतिसाव्यांत ॥ ७७ ॥ तो भ्रांति वारून । नृप दत्ताज्ञेनें येऊन । स्वबंधूस भेटून । आत्मज्ञान निवेदितसे ॥ ७८ ॥ अनसूयू सुबाहुकाशिराजासी । बोधून जाई वनासी । पुत्रा राज्य देवूनी वनासी । अलर्क ये अडतिसाव्यांत ॥ ७९ ॥ पुरूरव्याचा लेक । आयुनाम पुण्यश्लोक । पुत्र नाहीं म्हणून करी शोक होई सेवक दत्ताचा ॥ ८० ॥ तो वयः प्रमाण बरेंच । दत्तसेवेंत करी खर्च । मिळवी प्रसाद साच । कथन हेंच एकुणचाळिसाव्यांत ॥ ८१ ॥ राजा दिव्य फळ दे राणीला। तिला गर्भ राहिला । तिणें स्वप्नीं देव पाहिला । शौनकें कथिला तदभिप्राय ॥ ८२ ॥ महा वीर्य हुंडासुर । गर्भा माराया हो सादर । दत्तप्रसादें जन्मला कुमार । हा प्रकार चाळिसाव्यांत ॥ ८३ ॥ दानव मोहन घालून । नगरीं पोरा नेवून । माराया दे त्याचें रक्षण । अत्रिनंदन करितां झाला ॥ ८४ ॥ दत्तेंच रक्षिला म्हणून । वसिष्ठाचे हातीं सिकून । नहुषाचें झालें रक्षण । हें एकेचाळिसाव्यांत ॥ ८५ ॥ तें चक्षुर्बंधन मोहन । नासतां राणी उठोन । पुत्रातें न पाहून । दुःखी होवून प्रलापी ॥ ८६ ॥ आयु राजा तेथें येऊन । सर्वां धिःकारून । शोक करी दारुण । बेचाळिसाव्यांत हे कथा ॥ ८७ ॥ दुःखित राजा जाणून । दत्त नारदा दे पाठवून । नारद तेथें येऊन । सांगे ज्ञान रायासी ॥ ८८ ॥ अस्वतंत्र आपणा जाणून । राजा राणी करिती स्तवन ।

श्रीदत्ताचें हें कथन। त्रेचाळिसाव्यांत ॥ ८९ ॥ वनांत नहुष जावून। आकाशवाणी एकून। वशिष्ठापाशीं येऊन। घ जाणून सर्व ते ॥ ९० ॥ देव द्विजपीडकासुर। त्या माराया चाले कुमार। त्याचें सहाय्य करिती सुर। हें चौवेचाळिसाव्यांत ॥ ९१ ॥ सोडी प्राणहारक बाण। दैत्य सैन्य मारून। नहूष तो निर्भर्त्सून। मारी झुंजून हुंडासुरा ॥ ९२ ॥ ख्याती सोमवंशाची करून। अशोक सुंदरीस वरून। मायबापां भेटे तो येऊन। हे पंचेचाळिसाव्यांत ॥ ९३ ॥ विनवितां गुरूंसी। गुरु सांगे दीपकासी। ययाती वरी देवयानिसी। केली दासी शर्मिष्ठा ॥ ९४ ॥ परुपकार जाणून। त्या दे ययाती सिंहासन। दुःखें यदुवनीं जाऊन। दत्ता भेटे शेचाळिसाव्यांत ॥ ९५ ॥ त्या शून्य वनीं असून। निर्भय व्हावयाचें कारण। पुसतां करी कथन। तत्वज्ञान अवधूत ॥ ९६ ॥ स्वभावोदित गुण। घेतले म्हणे गुरु-पासून। पृथ्वी वाताकाश शिक्षण। सांगे सत्तेचाळिसाव्यांत ॥ ९७ ॥ त्या राजासी सांगे अवधूत। जलशिक्षणें झालों पूत। अग्निशिक्षणें वीट। घालवून नीट राहिलों ॥ ९८ ॥ ह्या जागृदादि अवस्था सोडाया। चंद्रार्क गुरु केले म्हणे म्यां। कवडा गुरु स्नेह सोडाया। अट्ठेचाळिसाव्यांत दत्त वदे ॥ ९९ ॥ म्हणे वांछा सोडाया अजगुरु। गांभीर्यार्थ समुद्र गुरु। रूप सोडाया पतंग गुरु। सार घ्यावया गुरु मधुकर ॥ १०० ॥ स्त्रियेस सोडाया गज गुरू। भिक्षार्थ मधुहर गुरू। गीत रस सोडाया मृगमत्स्य गुरू। हें एकूणपन्नासाव्यांत ॥ १०१ ॥ मनस्समाधानार्थ। गुरू केले हे यथार्थ। पिंगला वेश्या बाळख्यात। कुरर म्हणे टिटवू ॥ १०२ ॥ गुरू मीं केले म्हणे दत्त। स्त्रीकंकण सर्व शरकारख्यात। पेशस्कार कोळी देह विश्रुत। पन्नासाव्यांत बुद्धिबळें ॥ १०३ ॥ विविध धर्मान्वित। ज्ञान भक्तिरसभरित। असें हें श्रीदत्तचरित। मूर्तिमंत ब्रह्म कीं ॥ १०४ ॥ ब्रह्म ते अरूप असून। कोणा नये दिसून। करितां उपनिषदांचें श्रवण। मनन ध्यानें मग कळे ॥ १०५ ॥ मंदां विशेषेंकरून। नुमजे औपनिषदज्ञान। त्यांकरितां हें लेखन। करवी अत्रिनंदन दयाळू ॥ १०६ ॥ श्रीविष्णो जगत्पालका। जय विधे जगत्कारका। जय शंभो जगत्तारका। चित्तहारका तुज नमो ॥ १०७ ॥ तूं आर्य संरक्षक। तूंची अनार्यशिक्षक। तूंची हें ग्रंथकौतुक। करविसी लोक तारावया ॥ १०८ ॥ स्वयंज्योती तूं श्रीदत्त ॥ १०९ ॥ विहार तुझा स्वभक्त-हृदयांत। तूं भक्ताधीन सतत। मी मागतों पसरून हात। ह्या ग्रंथीं सतत सान्निध्य ठेवीं ॥ ११० ॥ तूंच मंदानुग्राहक। तूंचि वक्ता श्रोता पृच्छक। तूंचि चालक भासक। होसी ग्रंथग्राहक निर्मत्सर ॥ १११ ॥ कधीं पद्मिनी

बोलावी अमरा । कर्धी पंचक फिरवी माघारा । धरुनि ह्या विचारा । एवढा पुरा केला लेख ॥ ११२ ॥ इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीवासुदेवानंदसरस्वती कृतं श्रीदत्तमाहात्म्यं संपूर्णम् ॥

# श्रीगुरुचरित्र अवतरणिका

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीगुरुदेवदत्तात्रयचरणारविंदाभ्यां नमः । गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः । गुरुरेव परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः । श्रोते व्हावें सावधान । गुरुचरित्राध्याय बावन । ऐकोनि नामधारकाचें मन । ब्रह्मानंदीं निमग्न पें ॥ १ ॥ सेवूनि गुरुचरितामृत । नामधारक तटस्थ होत । अंगीं धर्म पुलकांकित । रोमांचही उठती ॥ २ ॥ कंठ झाला सद्गदित । गात्रें झालीं सकंपित । विवर्ण भासे लोकांत । नेत्रीं वाहती प्रेमधारा ॥ ३ ॥ समाधिसुखें न बोले । देह अणुमात्र न हाले । सात्विक अष्टभाव उदेले । नामधारक शिष्याचे ॥ ४ ॥ देखोनि सिद्ध सुखावती । समाधि लागली यासी म्हणती । सावध करावा मागुती । लोकोपकारा कारणें ॥ ५ ॥ म्हणोनि हस्तें कुरवाळिती । प्रेमभावें आलिंगिती । देहावरी ये ये म्हणती । ऐक बाळा शिष्योत्तमा ॥ ६ ॥ तूं तरलासी भवसागरीं । रहासी ऐसा समाधिस्त जरी । ज्ञान राहील तुझ्या उदरीं । लोक तरती कैसें मग ॥ ७ ॥ याकारणें अंतःकरणीं । दृढता असावी श्रीगुरुचरणीं । बाह्य देहाची रहाटणी । शास्त्राधारें करावी ॥ ८ ॥ तुवां विचारिलें म्हणोनि । आम्हां आठवली अमृताची वाणी । तापत्रयातें करी हानी । ऐशी अनुपम्या प्रगटली ॥ ९ ॥ तुजमुळें आम्हां आठवलें । तुवां आम्हां बरवें केलें । त्वांही एकाग्रत्वें ऐकिलें । आतां हेंचि विस्तारीं ॥ १० ॥ नामधारका ऐशियापरी । सिद्ध सांगती परोपरी । मग तो नेत्रोन्मीलन करी । कर जोडोनी उभा ठाके ॥ ११ ॥ म्हणे कृपेचें तारूं । तूंचि या विश्वास आधारू । भवसागर पैलपारू । तूंचि करिसी श्रीगुरुराया ॥ १२ ॥ ऐसें नामधारक विनवीत । सिद्धाचे चरणीं लागत । म्हणे श्रीगुरुचरितामृत अवतरणिक मज सांगा ॥ १३ ॥ या श्रीगुरुचरित्रामृतीं । अमृताहूनि परमातृप्ती । भक्तजनांची मनोवृत्ती । बुडी देवोनि स्थिरावली ॥ १४ ॥ मी अतृप्त आहे अजूनी । हेचि कथा पुनः सुचवोनि । अक्षयामृत पाजूनी । आनंदसागरीं मज ठेवा ॥१५॥ बहु औषधींचें सार काढोन । त्रैलोक्य

चिंतामणी रसायण । संग्रह करिती विचक्षण । तैसें सार मज सांगा ॥१६॥ ऐकोनीं शिष्याची प्रार्थना । आनंद सिद्धाचिया मना । म्हणती बालका तुझी वासना ; अखंड राहो श्रीगुरुचरित्रीं ॥ १७ ॥ श्रीगुरुचरित्राची ऐका । सांगेन आतां अवतरणिका । प्रथमापासुनि सारांश निका । बावन्नाध्यायपर्यंत ॥ १८ ॥ प्रथमाध्यायीं मंगलाचरण । मुख्य देवतांचें स्मरण । श्रीगुरुमुर्तीचें दर्शन । भक्ताप्रति जाहलें ॥ १९ ॥ द्वीतियाध्यायीं ब्रह्मोत्पत्ति । चारी युगांचे भाव कथिती । श्रीगुरुसेवा दीपकाप्रती । घडली ऐसें कथियेलें ॥ २० ॥ नामधारका अमरजासंगमा । श्रीगूरु नेतील आपुले धामा । अंबरीष दुर्वास यांचा महिमा । तृतीयाध्यायीं कथियेला ॥ २१ ॥ चतुर्थाध्यायीं अनसूयेप्रती । छळावया त्रैमुर्ति येती । परी तियेचे पुत्र होती । स्तनपान करिती आनंदें ॥ २२ ॥ पंचमीं श्रीदत्तात्रय धरी । स्वयें अवतार पीठापुरीं । श्रीपाद श्रियावल्लभाधारी तर्थियात्रेसी निघाले ॥ २३ ॥ सह्याद्रींत लिंग घेऊनी । रावण जातां गोकर्णीं । विघ्नेश्वरें विघ्न करूनी । स्थापना केली तयाची ॥ २४ ॥ गोकर्णमहिमा असंख्यात । रायाप्रती गौतम सांगत । चांडाळी उद्धरिली अकस्मात । सातव्या अध्यायीं वर्णिती ॥ २५ ॥ मातापुत्र जीव देत होती। तयाप्रती गुरु कथा सांगती । शनिप्रदोषव्रत देती । ज्ञानी करिती अष्टमीं ॥ २६ ॥ नवमाध्यायीं रजकाप्रती । कृपाळू गुरु राज्य देती । दर्शन देऊं म्हणती पुढती । गुप्त झाले मग तेथें ॥ २७ ॥ तस्करीं मारिला भक्त ब्राम्हण । तस्करां वधिती श्रीगुरु येऊन । ब्राह्मणाला प्राण दान । देती दशमाध्यायांत॥२८॥ माधव ब्राह्मण करंजपुरीं । अंबा नामें त्याची नारी । नरसिंहसरस्वती तिचे उदरीं। एकादशीं अवतरले ॥ २९ ॥ द्वादशाध्यायीं मातेप्रती । ज्ञान कथूनि पुत्र देती । काशीक्षेत्रीं संन्यास घेती । यात्रा करिती उत्तरेची ॥ ३० ॥ माता पित्यांतें करंजपुरीं । भेटोनि येती गोदातिरीं । कुक्षिव्यथेच्या विप्रावरी । कृपा करिती त्रयोदशीं ॥ ३१ ॥ क्रूर यवनाचें करूनि शासन । सायंदेवास वरदान । देती श्रीगुरु कृपा करून । चौदाविया अध्यायीं ॥ ३२ ॥ पंचदशीं श्रीगुरुमूर्ती । तीर्थें सांगती शिष्याप्रती । यात्रे दवडूनी गुप्त होती ॥ वैजनाथीं श्रीगुरु ॥ ३३ ॥ षोडशीं ब्राह्मणा गुरुभक्ती । कथूनि दिधली ज्ञानशक्ति । श्रीगुरु आले भिल्लवडीप्रती । भुवनेश्वरी सान्निध ॥ ३४ ॥ भुवनेश्वरीला मूर्ख ब्राम्हण ॥ जिव्हा छेदोनी करी अर्पण । त्यास श्रीगुरूंनीं विद्या देऊन । धन्य केला

सप्तदशीं ॥३५॥ घेवडा उपटूनि दरिद्रियाचा ॥ कुंभ दिधला हेमाचा ॥ वर्णिला प्रताप श्रीगुरुचा । अष्टादशाध्यायांत ॥३६॥ औदुंबराचें करूनि वर्णन । योगिनींस देऊनि वरदान । गाणगापुरास आपण । एकुणविशीं श्रीगुरु गेले ॥३७॥ स्त्रीयेचा समंध दवडून ॥ पुत्र दिधले तिजला दोन ॥ एक मरतां कथिती ज्ञान ॥ सिद्धरूपें विसाव्यांत ॥ ३८ ॥ तेचि कथा एकविशीं ॥ प्रेत आणिलें औदुंबरापाशीं ॥ श्रीगुरु येऊनी येथें निशीं ॥ पुत्र उठविती कृपाळू ॥ ३९ ॥ भिक्षा दरिद्याघरीं घेती। त्याची वंध्या महिषी होती ॥ तीस करून दुग्धवती ॥ बाविसाव्यांत वर दिधला ॥ ४० ॥ तेविसाव्यांत श्रीगुरूस ॥ राजा नेई गाणगापुरास ॥ तेथें उद्धरती राक्षस त्रिविक्रम करी गुरुनिंदा ॥ ४१ ॥ भेटों जाती त्रिविक्रमा ॥ दाविती विश्वरूप महिमा ॥ विप्र लागे गुरुपादपद्मा ॥ चोविसाव्यांत वर देती ॥ ४२ ॥ म्लेच्छापुढें वेद म्हणती ॥ विप्र ते त्रिविक्रमा छळती ॥ त्याला घेऊनी सांगाती ॥ गुरुपाशीं आला पंचविशीं ॥ ४३ ॥ सव्विसाव्यांत तया ब्राम्हणा ॥ श्रीगुरु सांगती वेद-रचना ॥ त्यागा म्हणती वादकल्पना ॥ परी ते उन्मत्त नायकती ॥ ४४ ॥ सत्ता-विशीं आणूनि पतिता ॥ विप्रांसी वेदवाद करितां ॥ कुंठित होऊनी शापग्रस्त ॥ ब्रम्हराक्षस त्या केलें ॥ ४५ ॥ अष्टविंशीं तया पतिता ॥ धर्मावर्म सांगोनि कथा ॥ पुनरपि देऊनि पतितावस्था ॥ गृहाप्रती दवडिला ॥ ४६ ॥ एकोनत्रिंशीं भस्म-प्रभाव ॥ त्रिविक्रम कथिता गुरुराव ॥ राक्षसा उद्धरी वामदेव ॥ हा इतिहास तयां तचीं ॥ ४७ ॥ त्रिंशाध्यायीं पति मरतां ॥ तयाची स्त्री बहु करी आकांता ॥ तीस श्रीगुरु नाना कथा ॥ कथूनी शांतवूं पाहती ॥ ४८ ॥ एकतिसाव्यांत तेचि कथा ॥ पतिव्रतेचें धर्म सांगतां ॥ सहगमन प्रकार बोधितां ॥ ते स्त्रियतें जगद्गुरु ॥ ४९ ॥ सहगमनीं निघतां सती ॥ श्रीगुरूस घाली नमस्कारिती ॥ आशीर्वाद देवोनी तिचा पति ॥ बत्तिसाव्यांत उठविला ॥ ५० ॥ तेहत्तिसाव्यांत रुद्राक्ष-धारण ॥ कथा कुक्कुट--मर्कट दोघेजण ॥ वैश्य-वेश्येचें कथन ॥ करिती रायातें परस्पर ॥ ५१ ॥ रुद्राध्याय महिमावर्णन ॥ चौतिसाव्यांत निरूपण ॥ राज-पुत्र केला संजीवन ॥ नारद भेटले रायातें ॥ ५२ ॥ पंचविंशत्प्रसंगांत ॥ कच-देवयानी कथा वर्तत ॥ आणिक सोमवारव्रत ॥ सीमंतिनीच्या प्रसंगें ॥ ५३ ॥ छत्तिशीं ब्रम्हनिष्ट ब्राह्मण ॥ स्त्रियेनें नेलें परान्नभोजना ॥ कंटाळूनी धरिती श्रीगुरुचरणा ॥ त्याला कर्ममार्ग सांगती ॥ ५४ ॥ सप्तत्रिंशीं नाना धर्म ॥ विप्रां

सांगोनि ब्रम्हकर्म । प्रसन्न होऊनि वर उत्तम । देती श्रीगुरु तयातें ॥ ५५ ॥ अष्ट-त्रिंशीं भास्कर ब्राम्हण ॥ तिघांपुरतें शिजवी अन्न ॥ जेविले बहु ब्राम्हण ॥ आणिक गांवचे शूद्रादि ॥ ५६ ॥ सोमनाथाची गंगा युवती । साठ वर्षांची वंध्या होती ॥ तीस दिधली पुत्र संतती ॥ एकूणचाळिसावे अध्यायीं ॥ ५७ ॥ नरहरी करवीं शुष्ककाष्ठा ॥ अर्चवूनी दवडीलें त्याच्या कुष्टा ॥ शबरकथा शिष्य वरिष्ठा ॥ चाळिसाव्यांत सांगती ॥ ५८ ॥ एकेचाळिशीं सायंदेवा ॥ हस्तें घेती श्रीगुरुसेवा ॥ ईश्वरपार्वती संवाद बरवा ॥ काशियात्रा निरूपण ॥ ५९ ॥ पुत्रकलत्रेंसीं सायंदेव ॥ येऊनी करिती श्रीगुरुस्तव । त्याला कथितीं यात्राभाव ॥ नरही देती बेचाळीसीं ॥ ६० ॥ त्रेचाळिसीं अनंतव्रत॥ धर्मराया कृष्ण सांगत ॥ तेचि कथा सायंदेवाप्रत ॥ सांगोनी व्रत करविती ॥ ६१ ॥ चवेचाळिसीं तंतुकार भक्तासी ॥ श्रीपर्वत दावूनी क्षणेंसीं ॥ शिवरात्री पुण्यकथा त्यासी । विमर्षण राजाची कथियेली ॥ ६२ ॥ पंचेचाळिशीं कुष्टी ब्राम्हण । आला तुळजापुराहून । त्याला करवूनी संगमीं स्नान । कुष्ट नासून ज्ञान देती ॥ ६३ ॥ कल्लेश्वर हिपरगे ग्रामास । श्रीगुरुस भेटनी नरहरी कवीस । आपुला शिष्य करविती त्यास । सेचाळीसावें अध्यायीं ॥ ६४ ॥ सत्तेचाळिसीं दिवाळीसण ॥ गुरूंसी आमंत्रिती सातजण । तितुकीं रूपें धरूनि आपण । गेलें मठींही राहिलें ॥ ६५ ॥ अठ्ठेचाळिशीं शूद्र शेतीं ॥ त्याचा जोंधळा कापूनी टाकिती ॥ शतगुणें पिकवूनी पुढती । आनंदिलें तयातें ॥ ६६ ॥ एकोणपंचाशतीं श्रीगुरुमूर्ती ॥ अमरजासंगम माहात्म्य कथिती ॥ आणिकही तेथें सांगती ॥ कुष्ट दैवार्जितीं रत्नाबाईचें ॥ ६७ ॥ म्लेच्छाचा स्फोटक दवाडिती ॥ भक्तीस्तव त्याचे नगरा जातीं ॥ पुढें श्रीपर्वतीं भेटों म्हणती ॥ पन्नासावें अध्यायीं ॥ ६८ ॥ एकावन्नबावन्नांत गुरुमूर्ती देखूनियां क्षितीं पापप्रवृत्ती ॥ उपद्रविताील नाना याती ॥ म्हणोनि गुप्तरूपें राहावें ॥ ६९ ॥ ऐसा करूनि निर्धार ॥ शिष्यांसी सांगती गुरुवर ॥ आजि आम्ही जाऊ पर्वता-वर । मल्लिकार्जुन यात्रेसी ॥ ७० ॥ ऐसे ऐकूनि भक्तजन । मनीं होती जाति उद्विग्न । शोक करिती आक्रंदोन । श्रीगुरुचरणीं लोळती ॥ ७१ ॥ इतुकें पाहूनि गूरुमूर्ती । वरदहस्तें तया कुरवाळिती ॥ मद्भजनीं धरा आसक्ती मठधामीं राहोनियां ॥ ७२ ॥ ऐसें बोधूनि शिष्यांसी । गुरु गेले कर्दळीवनासीं । नाविकमुखें सांगूनि गोष्टीसी । निजानंदीं निमग्न होती ॥ ७३ ॥ ऐसें अपार श्रीगुरुचरित्र । अनंत कथा परम पवित्र । त्यातील बावन्न अध्याय मात्र । प्रस्तुत कथिलें तुजलागीं ॥ ७४ ॥

सिद्ध म्हणे नामधारका । तुज कथिली अवतरणिका । श्रीगुरु गेले वाटती लोकां । गुरु गुप्त असती गाणगापुरीं ॥ ७५ ॥ कलियुगीं अधर्मवृद्धि पावले । म्हणोनि श्रीगुरु गुप्त झाले । भक्तजनांला जैसे पहिले । तैसेचि भेटती अद्यापि ॥ ७६ ॥ हे अवतरणिका सिद्धमाला । श्रीगुरु भेटती जपे त्याला । जैसा भावार्थ असें आपुला । तैसीं कार्यें संपादिती ॥ ७७ ॥ नामधारका तूं शिष्य मला । अवतरणिकेचा प्रश्न केला । म्हणोनि इतिहास सारांशाला । पुनः वदलों सच्छिष्या ॥ ७८ ॥ पूर्वी ऐकिलें असेल कानीं । त्यातें तात्काळ येईल ध्यानीं । इतरां इच्छा होईल मनीं । श्रीगुरुचरित्र श्रवणाची ॥ ७९ ॥ ऐशी ही अवतरणिका जाण । तुज कथिली कथांची खूण । इचें सतत करितां स्मरण । कथा अनुक्रमें स्मरतसे ॥ ८० ॥ ऐसें वदे सिध्दमुनी । नामधारक लागे चरणीं । विनवीतसे कर जोडोनी । तुझें वचनीं सर्व सिद्धी ॥ ८१ ॥ आतां असें विनवणी । श्रीगुरु सप्ताह पारायणीं । किती वाचावें प्रतिदिनीं । हें मज सांगा श्रीगुरुराया ॥ ८२ ॥ सिद्ध म्हणती नामधारका । तुवां प्रश्न केला निका । परोपकार होईल लोकां । तुझ्या प्रश्नें करूनियां ॥ ८३ ॥ अंतःकरण असतां पवित्र । सदाकाळ वाचावें गुरुचरित्र । सौख्य होय इहपरत्र । दुसरा प्रकार सांगेन ॥ ८४ ॥ सप्ताह वाचावयाची पद्धति । तुज सांगों यथास्थिती । शुचिर्भूत होवोनि शास्त्ररितीं । सप्ताह करितां बहु पुण्य ॥ ८५ ॥ दिनशुद्धि बरवी पाहून । आवश्यक स्नानसंध्या करून ॥ पुस्तक वाचावयाचें स्थान । रंगवल्यादि शोभा करावी ॥ ८६ ॥ देशकालादि संकल्प करून । पुस्तकरूपी श्रीगुरूचें पूजन । यथोपचारें करून । ब्राह्मणासही पूजावें ॥ ८७ ॥ प्रथम दिवसापासोन । बसावया असावें एकस्थान । अतत्वार्थ भाषणीं धरावें मौन । कामादि नियम राखावे ॥ ८८ ॥ दीप असावे शोभायमान । देव ब्राह्मण वडिलां वंदून । पूर्वोत्तर मुख करून । वाचनीं आरंभ करावा ॥ ८९ ॥ नवसंख्या अध्याय प्रथमदिनीं । एकविंशतीपर्यंत द्वितीय दिनीं । एकोनत्रिंश तृतीय दिनीं । चतुर्थ दिवशीं पंचतीस ॥ ९० ॥ अडतीसपर्यंत पांचवे दिनीं । त्रेचाळीसवरी सहावे दिनीं । सप्तमीं बावन्न वाचोनि । अवतरणिका वाचावी ॥ ९१ ॥ नित्य पाठ होतां पूर्ण । करावें उत्तरांगपूजन । श्रीगुरूतें नमस्कारून । उपहार कांहीं करावा ॥ ९२ ॥ याप्रकारें सप्त दिन । रात्रीं करावें भूमीशयन । सारांश शास्त्राधारेंकरून । शुचि-

भूत असावें ॥ ९३ ॥ एवं होतां सप्तदिन । ब्राह्मण सुवासिनी भोजन । यथाशक्त्या दक्षिणा देऊन । सर्व संतुष्ट करावें ॥ ९४ ॥ ऐसें सप्ताह अनुष्ठान । करितां होय श्रीगुरुदर्शन । भूतप्रेतादि बाधानिरसन । होवोनी सौख्य होतसें ॥ ९५ ॥ ऐसें सिद्धाचें वचन ऐकोनी । नामधारक लागे चरणीं । म्हणे बाळाची आळी पुरवोनी । कृतकृत्य केलें गुरुराया ॥ ९६ ॥ श्रोते म्हणती वंदूनि पायीं । श्रीगुरू केली बहु नवलाई । बाळका अमृत पाजी आई । तैसें आम्हां पाजिलें ॥ ९७ ॥ प्रति अध्याय एक ओंवी । ओंविली रत्नमाळा बरवी । मनाचे कंठीं घालितां पदवी । सर्वार्थासी पाववीत ॥ ९८ ॥ सिद्धाचें वचन रत्नखाणी । त्यांतलीं नामधारक रत्नें आणी । बावन्न भरोनि रांजणीं । भक्त याचका तोषविलें ॥ ९९ ॥ किंवा सिद्ध हा कल्पतरु । नामधारकें पसरिला करू । यांचा करोनि परोपकारू । भक्तांकरितां बहु केला ॥ १०० ॥ किंवा सिद्धमुनी बलाहक । नामधारक शिष्यचातक । मुख पसरोनि बिंदु एक । मागतां अपार वर्षला ॥ १०१ ॥ तेणें भक्तां अभक्तां फुकाचा । सकळां लाभ झाला अमृताचा । हृदयकोशीं खळजनांचा । पाषाण समयीं पाझरे ॥ १०२ ॥ श्रीगुरुरायाचे धरूं चरण । सिद्धमुनीतें करूं वंदन । नामधारका करूं नमन । ऐसें करी नारायणा ॥ १०३ ॥ श्रीगुरुरूपीं नारायणा । विश्वंभर दीनोद्धारणा । आपण आपुली दावूनी खुणा । गुरुशिष्यरूपें क्रीडसी ॥ १०४ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृते नृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे द्विपंचाशदध्यायसारे अवतरणिकानाम त्रिपंचाशत्तमोऽध्यायः । श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु । श्रीगुरुचरित्रम् समाप्तं ॥

# ४. श्रीदत्तभजन

## श्रीदत्ताचे अभंग

(१)

अनंत त्रिगुण सर्वांठायीं पूर्ण । न करी निर्वाण दासालागीं । साहाके बरोबरी धांवोनी सत्वरीं । भक्तालागीं तारी गुरुनाथ ॥ २ ॥ सुंदर तें ध्यान वसें औदुबरीं । व्याघ्रचर्मधारी शोभतसे ॥ ४ ॥ काषाय अंबर दंडकुमंडलु । डमरु त्रिशूळु शंखचक्र किरीट कुंडलें रुद्राक्षाच्या माळा । वैजयंती गळां हार रुळे ॥ ६ ॥ सूर्य

चंद्र नेत्र शेष फणी छत्र । पीतांबर वस्त्र परिधान ॥ ७ ॥ गुरुचरणीं सर्व तीर्थांची मिरासी । म्हणोनि जगासी उद्धरिती ॥८॥ जनार्दन म्हणे नलगे ब्रह्मज्ञान । गुरुचरणीं मन राहों सदा ॥

(२)

धन्य कृष्णातीरीं धन्य औदुंबर । जेथें गुरुवर बसतसे ॥ १ ॥ धन्य तेची नर येती जे यात्रेसी । दर्शनमात्रें त्यांसी मोक्ष जोडे ॥ २ ॥ अनंत जन्मांचीं पातकें संचित । तुरती किंचित तीर्थ घेतां ॥ ३ ॥ वाचितां चरित्र सद्गुरु स्वामीचें । निर्मूलन भवाचें सत्य होय ॥ ४ ॥ नामस्मरणें ज्याच्या सद्गुरुचें होणें । व्यर्थ चिंता वाहणें संसाराची ॥ ५ ॥ गुरु गीतीं गावा भावें चित्तीं ध्यावा । सगुण पाहावा डोळेभरी ॥७॥ जनार्दन म्हणे तीर्थे त्याचेपाशीं । चारी मुक्ती दासी होती त्याच्या ॥७॥

(३)

जन्मा आलों मी संसारीं । सखी मानिली अंतुरी । निंदा केली द्विजवरीं । कैसा सद्गुरु जोडेल ॥ १ ॥ नाहीं पूजिलें गुरुवरा । नाहीं नमिलें द्विजवरां । नाहीं केलें भजन सारा । कैसा भव हा आटेल ॥ २ ॥ जालों परधर्मी रत । अधर्म करितां वाटे हित । जन्ममरणाची खंत । कैसी आतां वाटेल ॥ ३ ॥ संसारीं मी दुखावलों । त्रिविध तापें मी पोळलों दुःखी होऊनिया आलों । औदुंबरीं या ठाया ॥ ४ ॥ आंकलखोप कृष्णातीरीं । गुरु वसती औदुंबरीं । भक्तवत्सल तारी तारी । म्हणवूनि चरण वंदिलें ॥ ५ ॥ जनार्दन पापरासी । करूनि आला तुजपासीं । तारिसील या भरंवसीं । धरणें घेतलें दारांत ॥ ६ ॥ —जनार्दन महाराज

(४)

दत्तात्रेय नाम । नित्य जपे तो निष्काम ॥१॥ तया नाहीं द्वैतभाव । दृष्टि दिसे गुरुराव ॥२॥ दत्ताविण नसे स्थान । दत्तरूप जनवन ॥३॥ ध्यानीं मनीं दत्तराज । दत्ताविण नाहीं काज ॥ ४ ॥ एकाजनार्दनीं जपा । दत्तनाम मंत्र सोपा ॥५॥

(५)

प्राणियासी मंत्र सोपा । दत्त दत्त वाचे जपा ॥१॥ आणीक नलगे साधन । दत्त नामें घडे ज्ञान ॥२॥ नलगे योगायोग पाहीं । दत्तावांचुन नेणें कांहीं ॥३॥ एका-जनार्दनीं वेधलें मन । मनचि जालें उन्मन ॥४॥

(६)

दत्त दत्त म्हणे वाचे । काळ पाय वंदी त्याचे ॥१॥ दत्तचरणीं ठेवी वृत्ति । होय वृत्तीची निवृत्ति॥२॥दत्तरूप पाहे डोळां । वंद्य होय कळिकाळा ॥३॥ एकाजनार्दनीं दत्त । हृदयीं वसे सदोदित ॥४॥

(७)

धन्य धन्य तेचि नर । दत्तनामीं जे तत्पर ॥१॥ त्यांचें होतां दरुशन । पतित होताति पावन ॥२॥. तयालागीं शरण जावें । काया वाचा आणि जीवें ॥३॥ शरण एकाजनार्दनीं । त्याचें पाय आठवी मनीं ॥४॥

(८)

उदार दयाळ गुरुदत्त । पुरवी हेत भक्तांचा ॥१॥ त्याचे चरणीं लीन व्हावें । शुद्धभावें करूनी॥२॥मुखीं स्मरा गुरुदत्ता । नाहीं दाता दुसरा॥३॥पायीं करा तीर्थयात्रा । गुरुसमर्था भजावें ॥४॥ म्हणे एकाजनार्दनीं । जनीं वनीं दत्त हा ॥५॥

( ९ )

कलियुगिं तारक । स्वामी दत्तराज एक ॥ १ ॥ त्याचें नाम नित्य गावें । भवसिंधूसि तरावें ॥ २ ॥ दत्तमूर्ति हृदयीं ध्यातां । पावें मोक्ष सायुज्यता ॥ ३ ॥ दत्त वसे जया मनीं । तया दत्त जनीं वनीं ॥ ४ ॥ एकाजनार्दनीं दत्त । सबाह्य स्वानंदभरित ॥ ५ ॥

( १० )

लागूनियां पायां जना विनवीत । मुखीं बोला दत्त वारंवार ॥ १ ॥ तेणें तुम्हा सुख होईल अपार । दत्त दयासागर आठवावा ॥ २ ॥ स्त्रिया पुत्र संसारा गुंतासि पामरा । तेणें तूं अघोरा पावशील ॥ ३ ॥ एकाजनार्दनीं चिंती दत्तपायां । दत्तरूप काया झाली त्याची ॥ ४ ॥

( ११ )

माझी दत्त ती माउली । प्रेमपान्हा पान्हावली ॥ १ ॥ कुर्वाळुनि लावी स्तना । नोहें निष्ठुर क्रोध नाहीं मनीं ॥ २ ॥ भक्तासी न विसंबे । सदा वाट पाहे बिंबे ॥ ३ ॥ एकाजनार्दनीं निश्चित । दत्तनामें पावन पतित ॥ ४ ॥

( १२ )

दत्तात्रय नाम ज्याचे नित्य मुखीं। तया समसुखी नाहीं दुजा ॥ १ ॥ भावें दत्त दत्त म्हणतसे वाचें। कळिकाळ त्याचें पाय वंदी ॥ २ ॥ दत्ताचें पै रूप ज्याचें वसे नेत्रीं। आहिक्य परत्री तोचि सुखी ॥ ३ ॥

( १३ )

केलें आवाहन। जेथें नाहीं विसर्जन ॥ १ ॥ भरला ओतप्रोत। स्वामी माझा देव दत्त ॥ २ ॥ गातां येत नाहीं। पूर्ण सुलीनता पाही ॥ ३ ॥ एकाजर्दनीं खूण। विश्वीं भरला परिपूर्ण ॥ ४ ॥

( १४ )

सहज सुखासनीं अनुसूयानंदन। पाहतां हें ध्यान वृत्ति निवे ॥ १ ॥ बालोन्मत्त पिशाच्च त्रिविध अवस्था धरी। आपण निराकारी सोहंभावे ॥ २ ॥ कारण प्रकृति न घेचि माया। चिदानंद सत्ता विलसतसे ॥ ३ ॥ एकाजनार्दनीं हृदयीं आसन। अखंडीत ध्यान निजतत्वीं ॥ ४ ॥

( १५ )

गुरु दत्तराया देई आलिंगन। तयासी वंदन करितो सर्व ॥ १ ॥ दत्तरायाची जे करितात यात्रा। त्यांचेनी पवित्र होतीं तीर्थें। ज्याचे चित्तीं वसे गुरुदत्त ध्यान। त्याचेनी पावन तिन्ही लोक ॥ ३ ॥ दत्तालागीं अर्पी तन मन धन। परब्रह्म पूर्ण तोचि झाला ॥ ४ ॥ दत्तचरणतीर्थ जो का नित्य सेवी। उगवितो गोवी प्रपंचाची ॥ ५ ॥ दत्तावरूनियां कुरवंडी काया। तयाचिया पायां मोक्ष लागे ॥ ६ ॥ एका-जनार्दनीं मुखीं दत्त नाम। हरे भवश्रम क्षणामाजीं ॥ ७ ॥

( १६ )

दत्त सबाह्य अंतरीं। दत्तात्रय चराचरीं ॥ १ ॥ दत्तात्रय माझें मन। हरोनि नेलें मीतूंपण ॥ २ ॥ मुळीं सिंहाद्रीपर्वतीं। दत्तात्रयें केली वस्ती ॥ ३ ॥ भक्तांमनीं केला वास। एकाजनार्दनीं विश्वास ॥ ४ ॥

( १७ )

नाम निजभावें समर्थ। जेथें नाम तेथें दत्त ॥ १ ॥ वाचें म्हणतां देवदत्त। दत्त करी गुणातीत ॥ २ ॥ दत्तनामाचा सोहळा। धाक पडे कळिकाळा ॥ ३ ॥

दत्तनामाचा निजछंद । नामीं प्रगटे परमानंद ॥ ४ ॥ एकाजनार्दनीं दत्त । सबाह्य स्वानंदें भरीत ॥ ५ ॥

(१८)

नाम मंगळा मंगळ । झालें जन्माचें सफळ ॥१॥ दत्त जीवींचें जीवन । दत्त कारणां कारण ॥२॥ अनुसूयात्मजा पाहीं । देहभाव उरला नाहीं ॥३॥ एकाजनार्दनीं दर्शन । चित्त झालें समाधान ॥४॥

( १९ )

नंदन जो अनुसूयेचा । तो तूं कैवारी आमुचा ॥ १ ॥ आमुचा तूं म्हणो जरी । भेट कां न देसी हरी ॥ २ ॥ हरी माझी अंतर्व्यथा । पद दावी तुझे नाथा ॥ ३ ॥ नाथा आलों काकुळती । कळकळसी न कां चित्तीं ॥ ४ ॥ का चित्तीं न ये दया । वासुदेवाची गुरुराया ॥ ५ ॥

( २० )

दत्ता कार्तवीर्य अर्जुन ये वेळां । आला कीं यदूला पाहिला कीं ॥ १ ॥ कीं अलर्कभक्त कीं ये नित्ययुक्त । प्रल्हाद जो मुक्त सक्त पदीं ॥ २ ॥ पदीं आयुराजा पडे कीं बा तुझा । विष्णुदत्त द्विजा भेटसी कीं ॥ ३ ॥ किंवा भार्गवराम पातला सुधाम । सोमकांत नाम राजा ये कीं ॥ ४ ॥ कीं अवघा पूसे कोठें जातां असें । दुःशकुन ऐसें मानसीं कीं ॥ ५ ॥ कीं दुर्दैव माझें आड पुढें आलें । म्हणोनी न केलें आगमन ॥ ६ ॥ पुरे हा संशय न होय निश्चय । वासुदेव पाय चिंती तुझे ॥ ७ ॥

(२१)

दत्ता धोपेश्वरीं करिसी कीं अंगीं । भस्मलेप वेगीं कां न येसी ॥१॥ न येसी भिक्षेसी गुंतूनियां दत्ता । कोल्हापुरीं आतां ताता कीं तूं ॥ २ ॥ कीं तूं पंढरीसी सुगंधी हुंगसी । पांचाळीं भुक्तीसी बससी कीं ॥ ३ ॥ बससी पश्चिम-सागरीं निकाम । वासुदेवें नाम घेतां दत्ता ॥ ४ ॥

( २२ )

धरी अवतार विश्व तारावया । अत्रीची अनुसूया गरोदरा । ऋतुकाळ हेमंत नक्षत्र रोहिणी । शुक्ल पक्ष दिनीं पूर्ण तिथि ॥ १ ॥ तिथि पूर्णिमा मास मार्गशीर्ष । गुरु तो वासर उत्सव काळ ॥ ३ ॥ एका जनार्दनीं पूर्ण अव-तार । निर्गुण निराकार आकारलें ॥ ४ ॥

( २२ )

अव्यक्त परब्रह्म न्हाणी पायांवरी । अभेद नरनारी मिळोनियां ॥ १ ॥ पीतांबर पदरें पुशिला घननीळ । निजविला निर्मळ पालखांत ॥ २ ॥ निंब कातबोळ त्रिगुण त्रिखुंडी । प्रेमाचे आवडी सेवी माय ॥ ३ ॥ एका जनार्दनीं दत्त पाळण्यांत घातिला । हालविती त्याला अनुसूया ॥ ४ ॥

(२४)

जो जो जो जो रे निज आया । हालविती अनुसूया ॥ पालख पुरुषार्थ चौकोनी । भक्तिनाडि गुंफोनी । दोरी प्रेमाची लाउनी । शांति गाती गाणीं ॥ १ ॥ करितां उत्पत्ति शिणलाशी । विश्रांति आलासी । निज रे ब्रह्मया तपलासी । कमलोद्भव जालासी ॥ २ ॥ लक्ष्मीपति निज हो घनश्यामा । सांडोनी वैकुंठधामा । प्रतिपाळ करी हो जीवनामा । दर्शन दिलें आम्हां ॥ ३ ॥ पार्वतीरमण शिवा निज आतां । संहारक जीवजंता । निजरूप निगमा हो आदिनाथा । एकाजनार्दनीं दाता ॥ ४ ॥

( २५ )

दत्त वसे औदुंबरीं । त्रिशूल डमरू जटाधारी ॥ १ ॥ कामधेनु आणि श्वान । उभे शोभती समान ॥ २ ॥ गोदातीरीं नित्य वस्ती । अंगीं चर्चिली विभूति ॥ ३ ॥ काखेमाजीं शोभे झोळी । अर्ध चंद्र वसे भाळीं ॥४॥ एकाजनार्दनीं दत्त । रात्रंदिन आठवित ॥ ५ ॥

( २६ )

दत्त माझा दिनानाथ । भक्तालागीं उभा सतत ॥ १ ॥ त्रिशूल घेऊनियां करीं । उभा असे भक्तद्वारीं ॥ २ ॥ भाळीं चर्चिली विभूति । रुद्राक्षाची माळ कंठीं ॥ ३ ॥ जवळी असे कामधेनु । तिचा महिमा काय वानूं ॥ ४ ॥ एका जनार्दनीं दत्त । रूप राहिलें हृदयांत ॥ ५ ॥

( २७ )

हातीं कमंडलु दंड । दत्तमूर्ति ती अखंड ॥ १ ॥ ध्यान लागो माझें मना । विनवितों गुरुराणा । अंगीं चर्चिली विभूति । हृदयीं वसे क्षमा शांति ॥ ३ ॥ तोचि चित्तांत आठव । गुरुराज दत्त देव ॥ ४ ॥ एका जनार्दनीं दत्त । तद्रूप हें झालें चित्त ॥ ५ ॥

(२८)

दत्त माझा पिता दत्त माझी माता । बहिणी बंधु चुलता दत्त माझा ॥१॥ दत्त माझा गुरु दत्त माझा तारूं । मजशीं आधारू दत्तराज ॥ २ ॥ दत्त माझें मन दत्त माझे जन । सोइरा सज्जन दत्त माझा ॥ ३ ॥ एका जनार्दनीं दत्त हा विसांवा । न विचारीत गावा जावें त्याच्या ॥ ४ ॥

(२९)

ऐसी जगाची माउली । दत्तनामें व्यापुनी ठेली ॥१॥ जावें जिकडे तिकडे दत्त । ऐसी जया मति होत ॥ २ ॥ तया सांकडेंचि नाहीं । दत्त उभा सर्वांठायीं ॥ ३ ॥ घात आघात निवारी । भक्ता वाहे धरीं करीं ॥ ४ ॥ ऐशी कृपाळू माउली । एकाजनार्दनीं देखियली ॥ ५ ॥

(३०)

आमुचें कुळीचें दैवत । श्रीगुरुदत्तराज समर्थ ॥१॥ तोचि आमुचा मायबाप । नाशी सकळ संताप ॥ २ ॥ हेंचि आमुचें व्रततप । मुखीं दत्तनाम जप ॥ ३ ॥ तयावीण हे सुटिका । नाहीं नाहीं आम्हां देखा ॥४॥ एका शरण जनार्दनीं । दत्त वसे तनमनीं ॥ ५ ॥

(३१)

## श्रीदत्ताचीं पदें.

जन हो श्रीपादपदीं मन ठेवा। मन कुमति न ठेवा । संगमिं संध्यास्नान करूनि । श्रीनृहरिचरणीं औदुंबरसेवा ॥ ध्रु. ॥ त्रिगुणात्मक दत्त दिगंबरमूर्ति । जे स्थितिलय करिती । कवणें वर्णावी तद्गुण कीर्ति । षड्गुणपरिपूर्ति । चरण-कमल-मकरंद मधुपसम । स्वात्मसुखें तत्सुख सेवा ॥ १ ॥ कृष्णा श्रीपूर्वक पंचगंगा । अति विमल तरंगा । मध्यें श्रीसद्गुरुपदयुगिं रंगा । परिहसुनि कुसंगा। अर्थ चतुर्विध सार्थक घडती । कृतार्थबुद्धि ठसतांचि सदैवा ॥ २ ॥ भजता सद्भावें यतिवरराणा । गुरुराज पुराणा । ग्रंथीं ग्रंथिकांनीं । कां ध्यानिं न आणा । प्रार्थित विठ्ठल नृसिंहसरस्वती । चरणयुगलगतभावा ॥ ३ ॥

(३२)

जय जय गुरुदेव देव दत्तात्रय देवा । पाहुनि तव पादपद्म सफल झाली सेवा ॥ ध्रु. ॥ सह्याद्रीशिखरीं नाथ क्रीडसि जगपाला । अनुसूयाबाळ

योगी वंदि अत्रि लाला ॥ २ ॥ त्रिभुवनेश त्रिगुणरूप । त्रिदेवांशरूपा । दर्शन भक्तांसि देसी । भुक्तिमुक्ति भूपा ॥ २ ॥ भागीरथीस्नान नित्य पावन करि काशी । बद्रिकाश्रमीं पुराण श्रवण करूं जासी ॥ ३ ॥ कोल्हापुरीं । करूनी भीक–भोजना सुरेंद्रा । पांचाळेश्वर तुं देव देवेश्वरिं निद्रा ॥ ४ ॥ थक्कित चकित झाले सर्व निगमागम स्वामी । तो तूं दत्त सर्वसाक्षी सर्वांतर्यामीं ॥ ५ ॥ सुरनर किन्नर हि दैत्य स्तविती तुज नाथा । त्या जनार्दना प्रसन्न होशि एकनाथा ॥ ६ ॥ शिवेनाथ गुरुदयाळ तारि दासदासी ॥ पाहें तुझ्या समीप उभा केशव उदासी ॥ ७ ॥

(३३)

धांव पाव दीनबंधु । श्रीदत्त देवा ॥धृ.॥ कमंडलु माळ करीं । डमरू त्रिशुलासि धरी । शंख चक्र भव हरी । द्यावि पादसेवा ॥ १ ॥ त्रैमूर्ति विराजिता । रसिक भाव भक्तहिता । अहं अग जीवीं धरिता । वारिता जन्ममेवा ॥ २ ॥ कलियुगीं भक्तप्रीति । होऊनि श्रीपादयति । रक्षि नृसिंहसरस्वति । अर्पि प्रेमसेवा ॥ ३ ॥ धूसरकांति दिव्यराज । विभूति अंगिं भव्य साज । भक्त जना पूर्ण काज । तूंचि गुप्त ठेवा ॥४॥ धांव पाव दीनबंधु । श्रीदत्त देवा ॥

(३४)

मनासी स्थिरता नामें दत्त वेध । दुजा नाहीं छंद आणीक कांहीं ॥ १ ॥ म्हणोनी संकल्प दृढ झाला पायीं । दत्तावांचूनी ठाईं नोहे कांहीं ॥ २ ॥ पाहतां पाहणें परतलें मन । पाहाण्याचें विंदान विसरलें ॥ ३ ॥ एकाजनार्दनीं परब्रह्म पुतळा । दत्त देखिला डोळां आत्मदृष्टी ॥ ४ ॥

(३५)

एकाएकी एकला काशीवासा गेला । स्वलीला श्रीदत्त स्वयें प्रकटला ॥१॥ दत्त देव आला दत्त देव आला । स्वभाव सांडोनी भेटावया चला ॥२॥ मुक्त मंडपामाझारीं निजनाम नगरीं । दत्त प्रगटला कीर्तनामाझारीं ॥ ३ ॥ भेटणें भेटी उठी दत्ता जाली भेटी । सांगणें ऐकणें दत्त होऊनि उठी ॥ ४ ॥ कीर्तनीं आतौता नाम श्रीदत्त दत्ता । निजकीर्ति ऐकोनी डोले तत्वतां ॥५॥ जळा सबाह्य अंतरीं मनकर्णिका तीरीं । दत्त स्नान करी आत्ममुद्रेवरी ॥६॥

दत्त जंगमीं स्थावरीं विश्वीं विश्व घरीं । तोचि दत्त घरोघरीं नित्य भिक्षा करी ॥ ७ ॥ एका जनार्दनीं दत्त वचनें देख । प्रपंच परमार्थ मीच चालवी एक ॥ ८ ॥

(३६)

दत्त ध्यावा दत्त गावा । दत्त आमुचा विसावा ॥१॥ दत्त अंतर्बाह्य आहे। दत्ताविण कांहीं नोहे ॥ २ ॥ दत्त वनीं दत्त जनीं । दत्त रूप हे अवनीं ॥३॥ दत्तरूपीं लीन वृत्ति । एकाजनार्दनीं विश्रांती ॥ ४ ॥

(३७)

या गुरुपदा शरण जाऊं । भवभय सगळे हरिल निजबळें । तत्पदरजकरण ललाटि लावूं ॥ गुरुपदा० ॥ १ ॥ रुचिर किती तनुवरची कांती । सौम्यताहि अमित तनुवरती । मूर्ति अशी निजहृदींच ठेवूं ॥ २ ॥ शोभतसे शिरीं जटाजूट तो । भस्मलेप तनुवरती दिसतो । छाटि कटीं तनुतयासी बाहू ॥३॥ भिक्षाटनप्रिय त्रिभुवनगामी भक्तजनप्रिय श्रीगुरुस्वामी । जगदाधारा तयासि गाऊं ॥ ४ ॥ विधिहरिशंकर त्रैमूर्ती ही । उत्पत्ति स्थिति-लय कारण ही ॥ तत्पदकमलीं मिलिंद होऊं ॥ ५ ॥

(३८)

श्रीगुरुदत्त देखिला काय । कुणीतरि सांगाहो ॥ ध्रु० ॥ छाटी आहे ज्याची लाल । कंठीं रुद्राक्षांची माळ । ज्याला कांपे थरथर काळ । मायाजाळछेदक जो ॥ १ ॥ काशीमध्यें करितो स्नान ॥ पांचाळेश्वरीं अनुष्ठान करवीरक्षेत्रीं भिक्षा जाण । शय्यास्थान माहुर जें ॥ २ ॥ श्रीगुरुदत्त देखिला काय ।

(३९)

दत्तपदीं मी भृंग । निरंतर । दत्तपदीं मी भृंग ॥ ध्रु. ॥ भवभयसंकट दुरंत निवारी । दुष्टाशा करि भंग ॥ १ ॥ सत्संगीं मन रंगो सदोदित । ऐसा दे मज ढंग ॥ २ ॥ दत्तनिरंजनिं नरहरिमानस । प्रेमें होवो दंग ॥ ३ ॥ दत्तपदीं मी भृंग । निरंतर । दत्तपदीं मी भृंग ॥

(४०)

भूवरीं कलीं प्रभु दत्त दिगंबर साचा । जो स्मरणीं पावतो शमवि ताप पापांचा ॥ ध्रु ॥ नरसिंहसरस्वति ख्यात गाणगापुरिंचा । मुनिवंद्य प्रभु तो दिव्यसाक्ष

वाणीचा । ( चाल ) म्हणुनि तूं त्यासि वंदावें । मानवा । गुण त्याचे निशिदिनिं गावें । गुरुचरणीं मन रिझवावें । मानवा । एकभावें शरणचि जावें । मानवा । संसारसागरीं तरणी–पंथ नामाचा । नरहरीमनीं तो सतत ध्यास श्रीगुरुचा ॥ १ ॥ भूवरीं कलीं प्रभु दत्त दिगंबर साचा । जो स्मरणिं पावतो शमवि ताप पापांचा ॥

(४१)

वंदी त्या त्रिगुणाला । कवि हा सकल शिवार्थी वेदमयाला ॥ ध्रु. ॥ प्रथम रजातें धारणकर्ता । निखिल जगाचा होई धाता । सत्वगुणानें पालनकर्ता । तैसें संहाराला । स्वीकारी जो ईश तमाला । वंदी त्या त्रिगुणाला । कवि हा सकल शिवार्थी वेद-मयाला ॥ १ ॥

(४२)

जय श्रीदत्ता अवधूता । त्रिविधतापहर शांतिकराचि तूं । असासि मोक्षदाता ॥ ध्रु. ॥ जोडुनि पाणि लागूं चरणां । निशिदिनिं तुझिया बा सगुणा । करिसी दीनांवर करुणा । भवजलधींतुनि तारीं निशिदिनिं । प्रार्थूं अत्रिसुता ॥ १ ॥ जय श्रीदत्ता अवधूता । त्रिविधतापहर शांतिकराचि तूं असासि मोक्षदाता ॥

( ४३ )

गुरुदत्त दिगंबर भज रे । त्रैमूर्ति अत्रितनया रे ॥ ध्रु. ॥ पायीं खडावा कटी मेखळा दंडकमंडलु माला । शंख शूल षट्करीं धरी जो चक्र विमल कमलाला । नामसुधासव मोचन करितें आखिल मुमुक्षुजनवृंदा । श्रीपाद श्रीवल्लभ नरहरि सद्-गुरुचरणा वंदा । गुरुदत्त दिगंबर भज रे । त्रैमूर्ति अत्रितनया रे ॥ २ ॥

( ४४ )

दिसे स्वरूप हें किती मनोहर । रतिमदनाहुनि कितितरी सुंदर । असें मनोहर ॥ ध्रु. ॥ जटामुगुट शिरिं । त्रिशुल डमरु करिं । भस्मविभूषित काया । शोभते किती अत्रितनया । कांति परम सुकुमार । विधाताहि वर्णूं शकेना अनंता स्वरूपा ॥ १ ॥ दिसे स्वरूप हें किती मनोहर । रतिमदनाहुनि कितितरि सुंदर । असें मनोहर ॥

(४५)

अनुसुयासुता त्वदीयपदीं मन रमवी । तुज वंदुनि प्रेमें विनवी ॥ध्रु०॥ मार हा नको संसृतिचा । मज गमे पथचि नरकाचा । दाखवीं मार्ग मोक्षाचा । षड्रिताप

हा तुरवी ॥१॥ सहवास घडो संतांचा । क्षय अक्षय हा दुर्मतिचा । निशिदिनीं घोष नामाचा । जनन मरण हें चुकवीं ॥२॥ अनुसुयासुता त्वदीयपदिं मन रमवी तुज वंदुनि प्रेमें विनवी ॥३॥

(४६)

मानसिं मूर्ति तीच जडली । हरिहरब्रह्मा त्रिगुणात्मक जी भूवरिं अवतरली ॥ध्रु०॥ विभूषित भस्मानें काया कमंडलु धरि करिं दंडा या । खडावा शोभतात पायां । ज्याचे गुण वर्णाया श्रुतिची मति कुंठित झाली ॥ १ ॥ जयाचे स्मरणें पतित तरती महारोगादि व्याधि हरती । पिशाच्चें धाकें थरथरती । श्रीगुरुचरणसरोजां शंकर-मति भ्रमली रमली ॥ २ ॥ मानसिं मूर्ति तीच जडली । हरिहरब्रह्मा त्रिगुणात्मक जी भूवरिं अवतरली ॥

( ४७ )

अत्रितनया । दत्तराया । कोण तुजसम समर्थ जगतीं । व्यापुनियां अखिल महीतें सर्व सूत्रें तुझेच हातीं ॥ध्रु०॥ मृगजलवत् संसार मानुनीं । नामरसा सेवण्या निशि-दिनीं । समर्थ ते त्वत्पदास जाती ॥ १ ॥ कुजन कुमतिचा सुजन विवेकी । करण्या तुजसम कोण विवेकी । शंकरा प्रिय तुझीच मूर्ती ॥ २ ॥ अत्रितनया दत्तराया । कोण तुजसम समर्थ जगतीं । व्यापुनियां अखिल महीते सर्व सूत्रें तुझेच हातीं ॥

( ४८ )

दत्तगुरु दत्तगुरु दत्तगुरु सुमरले । और कछु नहि आवे अंत ते रे, मना ॥ध्रु०॥ श्रीपादनरसिंहसरस्वतीचरनपर । कृष्णजल तुलसिदल डार दे रे, मना ॥ १ ॥ कृष्णातटनिकट वृक्षछायेतले । हरिहर अवतार जगको उधारे । गोपालकृष्णके दासके सीसपर । हाथ धरिये महाराज मेरे ॥ २ ॥ दत्तगुरु दत्तगुरु दत्तगुरु सुमरले । और कछु नहि आवे अंत ते रे, मना ॥०॥

( ४९ )

गाणगापुरवासि प्रभो पाहि पाहि माम् । त्रिगुणात्मक मूर्ति सगुण पाहुनी मनिं आराम ॥ ध्रु० ॥ दर्शनार्थ भाविकजन येति दुरुनी । अर्चिति तुज षोडशविधि । भक्ति सुमनीं । तद्वांछित पूर्ण करिसी प्रार्थिताक्षणीं सेवाया चरण तुझे । पातलों त्यजुनि धाम ॥ १ ॥ भक्तवत्सल ब्रीद तुवा कंठिं बांधिलें । महिमा तव वर्णितांचि वेद शीणले । संसृतितें त्रासुनि अति दीन जाहले विष्णुहृदय होऊं मग्न स्मरणिं

बच नाम ॥ २ ॥ गाणगापुरवासि प्रभो पाहि पाहि माम् । त्रिगुणात्मक मूर्ति सगुण पाहुनि मनिं आराम ॥ ३ ॥

( ५० )

दत्त तो हा पंचगंगासंगमीं राही हो । भस्मालेपन दिव्यं विमोचन यतिमन-रंजन ॥ धृ० ॥ रत्नजडित हातीं कंबु जयाचे सन्निध शोभे कामधेनु हो । ( चाल ) डमरू धारण । पिशाच्च–दंडन । भक्ताकारण ॥ १ ॥ भिक्षुकवेषा घेउनि सुंदर । करवीरीं भिक्षा केली हो । अभिनंदन यमभय भंजन । भवभय–कंदन ॥२॥ होऊनि तल्लिन बाळकृष्ण हा जटाधराला स्तवी हो । पापीं हें मन । करि भ्रमनिरसन । देई दर्शन ॥ ३ ॥

( ५१ )

मजवरी का बरि दृष्टि नसे । जरी मी दोषि असें ॥ धृ० ॥ माझ्या दोषा नाहीं गणित । अगणित भूकणसें ॥ १ ॥ नाहीं दयाळू लोकी तुज सम । मजसम दोषि नसे ॥ २ ॥ रोगीच नसतां मग कोण पुसता । असतां वैद्य जसें ॥ ३ ॥ दयनीय नसतां दयाळू वार्ता । पुसतां कोण असे ॥ ४ ॥ गुरू माय बाप तूं हरी ताप । कोप तव चित्तीं नसे ॥ ५ ॥

( ५२ )

दंड कमंडलु भस्मांगीं चर्चित । तो अत्रिनंदन गा रे ॥ धृ० ॥ व्याघ्रांबरधर तनु दिगंबर । मस्तकीं धरिला जटाभार । रक्त गौर श्यामसुंदर । शोभती पहा रे ॥ १ ॥ ब्रह्मा विष्णु रुद्र मिळोनी । अमित वर्षें अत्रिसदनीं । अनसूया सती छळिती जननी । याजें दंभ हा रे ॥ २ ॥ म्हणती माते भोजन पाणी । तृप्त करी नग्न होउनी । ऋषिपत्नी त्या लावी स्तनीं । करुनी बलात्कारें ॥ ३ ॥ पाहुनी पतिव्रता सत्य । धरिती अवतार दत्त । गणपती त्याच्या चरणीं चित्त । ठेवुनि गातसे रे ॥ ४ ॥

[चतुरंग प्रबंध–धनाश्री] मनिं भरला अवधूत रे रे । सकलेप्सित हेतु आदि गुरु; शरीर संगपणें शशिशीतलु, अखंडितु वो, सुवासीत दत्तु, स्रजा शोभितु गंधें करुनि चर्चितुवो, अनंता सुखातें देतु; मुक्तावळी ययाउरीं; किरीटादि अलंकारी, दिनमणी विफचुजाला; अरे उपमानें गेलीं लया ॥ १ ॥

# दत्ताच्या आरत्या

मूर्तित्रयगुणसारं निर्गुणविस्तारम् । षड्गुणपारावारं दुर्जनसंहारम् । भक्तप्रियदातारं कल्पितपरिवारम् ।मुनिजनमानसहारं निगमागमसारम् ॥ धृ० ॥ जयदेव जयदेव वंदे गुरुचरितं । कृपया मानसदुरितं मामुद्धर त्वरितं ॥ १ ॥ श्रीपाद श्रीवल्लभ यतिवर कृतकृत्यम् । नरहरिभारतिलीला ब्रम्हादिकस्तुत्यम् । कलिमलदाहकमंगलदायकफलनित्यम् । पामर देही मे पुस्तक मयि चित्तं ॥ २ ॥ त्वद्गतलीलासारं श्रुतिसकलाधारं । कांडत्रयविस्तारम् प्रत्ययलघुकारम् । कल्पद्रुमफलभारं कल्पितदातारम् । पठणामृतरसधारं भवभयपरिहारम् ॥ ३ ॥ अगाधश्रीगुरुकरणं भूइच्छातरणम् । ज्ञानामृतरसभरणम् जडजीवोद्धरणम् । भक्त्या कृतमपि स्मरणं तापत्रयहरणं निगमारीहितमहिमा [illegible] मोक्षश्री[illegible] ॥ ४ ॥ श्रीगुरुकरुणाकृत्यं सिद्धेश्वरगीतम् । शारदगंगाधरसुतमथितं नवनीतम् । [illegible] भक्तप्रियकरकृत लौकिकदत्तम् । त्वद्गतशेषं वांछितसखहरिहर[illegible] ॥ ५ ॥ जयदेव जयदेव वंदे गुरुचरितम् । कृपया मानसदुरितं मामुद्धर [illegible] ॥

## २

आरति ओवाळूं अनसूया[illegible] दत्तात्रेया ॥ धृ० ॥ सर्वांतरिचें जें निजगूजसाक्षि भूतचि तेज । संसार वृक्षाचें [illegible] बीज । तो हा सद्गुरुराज । विरज ब्रम्हजया म्हणती तया ॥ श्रीगुरु[illegible] ॥ १ ॥ सात्विक हृदय हे आरती । निज कर्मांच्या वाती । विवेक स्नेहानें [illegible] निगुती । भिजवुनि ज्ञान ज्योति पाजळुनि पेटविल्या । ओवाळल्या श्री[illegible] ॥ २ ॥ आरति उजळीतां ह्या चित्ता । मध्यें तिळभर ध्वांता । वार्ता [illegible] मिळतां दृश्यता । आलि निमषेण जाता ॥ सोहं प्रकाश हा हो सखया । [illegible] दत्तात्रेया ॥ ३ ॥ प्रकाश आरतिचा हा थोर । सबाह्य अभ्यंतर । मी-तू [illegible] अंधकार । जालुनि झळके फार । वेगळा वासुदेव तेथुनिया । नोहे द[illegible] ॥ आरति ओवाळूं ॥ ०

## ३

।दिगंबरा दिगंबरा श्री[illegible] [illegible]बरा । आरति हे तव चरणीं राहो । आरति हे तव चरणीं [illegible] [illegible]रवरा ॥ धृ० ॥ दि[illegible]र वेष्टितमम्बर

मेव प्रत्यग्ब्रह्मेति । खंब्रह्मेति श्रुतिरपि वदतिद । खंब्रह्मेति श्रुतिरपि वदतीद् । दिगंबराचोत ॥ १ ॥ दिगवत् चाम्बरमेव व्यापक पूर्ण ब्रह्मेति । सच्चित्सुखघन मायातीतं । सच्चित्सुखघन मायातीतं दिगंबरा वदति ॥ २ ॥ श्रीपाद वल्लभ नाम प्रापहि नक्र गजेंद्रमिव । द्रौपद्यंबरीष चोर । द्रौपद्यंबरीष चोर ग्रसितद्विजमेव ॥३॥ दिगंबरा गुरु वासुदेव दत्तस्त्वं ब्रम्ह । कामक्रोध ग्रसितं मान्लभ । कामक्रोध ग्रसितं मान्लभ तयैव झटितिवह ॥ ४ ॥ दिगंबरा० ॥

## ४

श्रीगुरु दत्तराजमूर्ति । ओवाळितों प्रेमें आरती ॥ धृ० ॥ उद्धार जगाचा । जाहला बाल अत्रिऋषिचा । धरिला वेष असे यतिचा । मस्तकीं मुकुट शोभे जटिचा । ( चाल ) कंठिं रुद्राक्षमाळ स्मरणीं । हातांमध्यें आयुष्य बहुत वर्णी । तेणें भक्तांचें क्लेश हरणी । त्यासी करुनि नमन, अघशमन, होईल रिपुदमन, गमन असे त्रैलोक्यावरती । ओवाळितों प्रेमें आरती ॥ १ ॥ गाणगापुरीं वस्ति ज्याची । प्रीति औदुंबरछायेची । भीमाऽमरजासंगमाची । भक्ति असे बहुत सुशिष्यांची वाट दाउनिया योगाची । ठेव देतसे निजमुक्तीची । ( चाल ) काशीक्षेत्रीं स्नान करितो । करवीरीं भिक्षेला जातो । माहुरिं निद्रेला वरितों । जरतारतरित, छाटि झरझरित, नेत्र गरगरित, शोभे । त्रिशुल जपा हातीं । ओवाळितों प्रेमें आरती ॥ २ ॥ अवधूतालागीं सुखानंदा । ओवाळितों सौख्यकंदा । तारि हा दास रदनकंदा । सोडवी विषयमोहछंदा । आलों शरण अत्रिनंदा । दाविं सद्गुरु ब्रम्हानंदा । ( चाल ) चुकवी चौऱ्याशीचा फेरा । घालिती षड्रिपु मज घेरा । गांजिति पुत्रपौत्रदारा । वदनीं भजन, मुखीं पुजन, करितसें, तयाचें बळवंता । ओवाळितों प्रेमें आरती । श्रीगुरु दत्तराजमूर्ति । ओवाळितों प्रेमें आरती ॥ ३ ॥

## ५

अनसूयानंदना तुज ओवाळूं आरती । अनसूयानंदना मज निज चरणीं दे रति ॥ धृ० ॥ सर्वात्मा तूं असोनी निजशी बा माहुरी । करिशी तूं स्नान नित्य प्रेमें काशीपुरीं । निजदासा भेट द्याया भिक्षा कोल्हापुरीं । वससी ना विश्रांती सह्याद्रीगिरीवरी अनसूयानंदना ॥ १ ॥ निज भजकां भेट देसी निजनामोच्चरणें । कलिमाजीं त्राहती तुज दत्ता या कारणें । जाणुनि हें तुजपाशीं केलें म्यां मान्हाणें निज-

चरणा दावि त्याहुनि नच दुसरें मागणें ॥ अनसूयानंदना ॥ २ ॥ पतिरूपा घेऊन तूं वससी कृष्णातटीं । निजदासा उद्धराया जागृत तूं संकटीं । प्रत्यक्ष गाणगापुरीं दिससी दासा मठीं । समजुनि हें वासुदेव तुज जोडी करपुटीं । अनसूयानंदन तुज ओंवाळूं आरती । अनसूयात्मनंदना मज निज चरणीं दे रति ॥ ३ ॥

६

आरती करूं भवदवदव सद्गुरू भाविक निजभजका । अनुकंपी जो उद्धरि नरहरि दत्तात्रय लोकां ॥ धृ० ॥ निजभजकाचा साचा आमुचा अससी कनवाळु । तुजसम मंगलधामा परमा नेणोंचि कृपाळु । तूं अघहारक तारक कारक गणपाळु । परमकृपाळु तूं स्नेहाळू तारिसी निजलोका । आरति करूं भवदवदव सद्गुरू भाविक निजभजका ॥ १ ॥ अत्रिमुनींच्या भावा भुलुनी होऊनी तदधीन । अनसूयेच्या उदरीं जो धरि अवतार सुपूर्ण । दत्तात्रेय यतीश्वर असें मिरवी अभिधान । वासुदेव यच्चरण सेवुनी पावन करि लोकां ॥ २ ॥ आरति करूं भवदवदव सद्गुरू भाविक निजभजका ।

७

त्रिगुणात्मक त्रैमूर्ति दत्त हा जाणा । त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा । नेति नेति शब्द नये अनुमाना । सुरवरमुनिजनयोगिसमाधि नये ध्याना । जयदेव जयदेव जय श्रीगुरुदत्ता । आरती ओंवाळितां हरली भवचिंता ॥ धृ० ॥ सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त । अभाग्यासी कैंची कळे ही मात । पराही परतली तेथें कैंचा हा हेत । जन्ममरणाचाही पुरलासे अंत ॥ २ ॥ दत्त येउनीयां उभा ठाकला । सष्टांगनमनें प्रणिपात केला । प्रसन्न होऊनी आशीर्वाद दिधला । जन्ममरणाचा वा फेरा चुकविला । जय० ॥ ३ ॥ 'दत्त दत्त' ऐसें लागलें ध्यान । हारपलें मन झालें उन्मन । मी तूंपणासी झाली बोळवण । एका जनार्दनीं दत्त हा जाण ॥ ४ ॥ जयदेव जयदेव जयश्रीगुरुदत्ता । आरती ओंवाळितां हरली भवचिंता ।

८

आतां आरती दत्त ओंवाळूं जातां । आरतीचें हरण दत्तें केलें तत्त्वतां । आरती उरली आतां ओंवाळूं कैसी । तरी निजभजनें निरंजन होतसे । आरतीचे आर्त दी श्रीदत्त । एकाजनार्दनीं सहज ओंवाळीत ॥ १ ॥

९

स्वानंदें आरती दत्त पाहूं गेले डोळां । तंव चराचर अवघा श्रीदत्त स्वलीला । विस्मयें दाटला आतां ओवाळूं कैसें । देखतें देखणें श्रीदत्तची दिसे ॥ धृ० ॥ असे आणि नसे हा तो विकल्प जना । दत्तीं दत्तस्थिति जनीं देखुनी जनार्दना । जनीं जनार्दनीं निजरूप दत्त । एकाजनार्दनीं तेथें अद्वैत नित्य ॥ १ ॥

## ॥ श्रीदत्ताचा विडा ॥

विडा घ्याहो सद्गुरुराया । धरूनी मानवाची काया । यतिवेष घेउनिया । बससी दीनासी ताराया ॥ धृ० ॥ ज्ञान हें पूगीफळ । भक्ति नागवल्लिदल । वैराग्य चूर्ण विमल । लवंगा सक्रिया सफळ । विडा० ॥ १ ॥ प्रेमरंगीं जैसा कात । वेळा अष्टभावांसहित । जायफळ क्रोधरहित । पत्री सर्वभूतहित । विडा० ॥ २ ॥ खोबरें हेंचि क्षमा । फोडुनी द्वैताच्या बदामा । मनोजयाचा वर्ख हेमा । कापूर हा शांतिनामा । विडा० ॥ ३ ॥ कस्तुरी निरहंकार । कोठें न मिळती हे उपचार । भीमापुत्र यास्तव फार । प्रेमें विनवी वारंवार । विडा० ॥ ४ ॥

## शेजारतीपूर्वी करावयाचें ध्यान

श्रीपाद श्रीवल्लभ नरहरी तारि तारि मजला । दयाळा तारि तारि मजला । श्रमलों मी या प्रपंचधामीं आलों शरण तुला ॥ धृ० ॥ करितां आटाआटी प्रपंच अवघा दिसतो मिथ्यत्व । दयाळा दिसतो मिथ्यत्व । म्हणवुनी भजन तुझें मज वाटे तारक सत्यत्व ॥ १ ॥ किंचिन्मात्र कृपा जरा मजवरी करिशिल उदार मन । चुकलों मी या विषयसुखाचे आहारांतून जाण ॥ २ ॥ कृष्णातटनिकटीं जो विलसे औदुंबरछायीं । हंस परात्पर भारतिनायक लीन तुझे पायीं ॥ ३ ॥ श्रीपाद श्रीवल्लभ नरहरी तारि तारि मजला । दयाळा तारि तारि मजला । श्रमलों मी या प्रपंचधामीं आलों शरण तुला ।

## ॥ शेजारती दत्ताची ॥

आतां स्वामी सुखें निद्रा करा अवधूता । करा अवधूता । चिन्मय सुखधाम जाऊनि पहुडा एकांता ॥ धृ० ॥ वैराग्याचा कुंचा घेऊनि चौक झाडीला । स्वामी चौक झाडीला । तयावरी सुप्रेमाचा शिडकावा दिधला । पायघड्या घातल्या सुंदरा नवविधा भक्ति । सुंदर नवविधा भक्ति ज्ञानाच्या समया लावुनी लाविल्या।

ज्येति १ ॥ आर्ता० ॥ भावार्थाचा मंडप हृदयाकाशीं टांगीला । हृदयकाशीं टांगीला । मनाच्या सुमनें करूनी केलें शेजेला । द्वैताचें कपाट लावूनी एकत्र केलें। गुरु हें एकत्र केलें दुर्बुद्धीच्या गांठी सोडुनी पडदे सोडिले ॥ आर्ता० ॥ २ ॥ आशा तृष्णा कल्पनेचा सांडुनी गलबला । सांडुनी गलबला । दया क्षमा शांति दासी उभ्या शेजेला । अक्षय्य उन्मन देऊनि नाजुक तो शेला । देऊनि नाजुक तो शेला । निरंजन सद्गुरु स्वामीं निजे शेजेला ॥ आर्ता० ॥ ३ ॥

## ॥ श्रीदत्त-ध्यान ॥

तळवटीचे उभयकर । तेथील परिसाजी प्रकार । माळाकमंडलु दंडधर । अतिसुंदर शोभती ॥ ८० ॥ मध्यस्थ जे कां द्वयकमल । तेथें डमरू आणि त्रिशूल । खड्गतेजायमान तेजाळ । अति झळाळ तयाचा ॥ ८१ ॥ उर्ध्वबाहु अभय पाही । शंख चक्र हे तये ठायीं । कचित्गदा पद्म तेंही । एवं साही शोभती ॥ ८२ ॥ ऐसा हा दत्त सत्पात्र । कक्षें झोळी हेमपात्र ॥ रूप धरी नाना विचित्र । सर्वे पवित्र कामधेनु ॥ ८३ ॥ ऐसें परिसोनि विवरण । संतोषलें श्रोतयांचें मन । म्हणती पुढील निरोपण । करवी पान रस आम्हां ॥ ८४ ॥ अवश्य म्हणे तैं वक्ता । श्रवणीं सादर व्हावें आतां । ध्यानीं लक्षोनिया दत्ता । झाला स्तविता नारद ॥ ८५ ॥ जयजयाजी अविनाशा । निर्गुण निरामया परेशा । मायातीता तूं सर्वेशा । अनंतवेषा नमो तुज ॥ ८६ ॥ जय जय निखिल ब्रह्मसनातना । सर्वात्मका सर्वभूषणा । षड्गुणैश्वर्यसंपन्ना । दयाघना नमो तुज ॥ ८७ ॥ जय-सर्व साक्षी सर्वज्ञा । जय जयाजी गुणप्रज्ञा । सकळातीता सर्वसूज्ञा । भक्तवरज्ञा नमो तुज ॥ ८८ ॥ जय जय सगुणवेषासुंदरा । जय रजोगुणा सृष्टिविस्तारा । जय सृष्टिपालना सत्वधीरा । सृष्टिसंहारा तामसा नमो ॥ ८९ ॥ जयजयाजी अत्रिनंदना । जय अनसूयात्मजा कुलभूषणा । त्रिगुणात्मका त्रिताप हरणा । भवभयभंजना नमो तुज ॥ ९० ॥ जय जय सिंहाचल निवासिया । मायापुरवासी करुणालया । जय जय भक्तवत्सला दत्त सदया । प्रेमें तव पाय प्रणम्य ॥ ९१ ॥ जय जय सिद्धा योगेश्वरा । पापमोचका कृपासागरा । जीवपालका जगदुद्धारा । अचलअगोचरा नमो तुज ॥ ९२ ॥

# अकारादिः श्रीदत्ताष्टोत्तरशत नामावलिः ।

१ अनसूयाताय नमः २ अनंताय नमः ३ आप्राय नमः ४ आत्रेयाय नमः ५ आत्मदाय नमः ६ इडापतये नमः ७ इलेशाच्र्याय नमः ८ ईशाय नमः ९ ईडितसद्गुणाय नमः १० उन्मत्ताय नमः ११ उत्तम यशसे नमः १२ ऊत्कृते नमः १३ ऊर्ध्वगतिप्रदाय नमः १४ ऋणहर्त्रे नमः १५ ऋषिश्रेष्ठाय नमः १६ ॠबंधाय नमः १७ ॠजशिक्षकाय नमः १८ ऌस्थबधाय नमः १९ ऌगतिदाय नमः २० ॡशाईने नमः २१ ॡपुरः सराय नमः २२ एष्यदिष्टज्ञाय नमः २३ एकार्थाय नमः २४ ऐकात्म्यप्रदाय नमः २५ ऐक्यदृश नमः २६ ओंकार वाच्याय नमः २७ ओजोमेदाय नमः २८ औदासिन्यदाय नमः २९ औपधाय नमः ३० अंडस्थाय नमः ३१ अंतःकरणये नमः ३२ अःय नमः ३३ अःस्तनिजहुन्मलाय नमः ३४ कर्मातीताय नमः ३५ कार्तवीर्येशे नमः ३६ कलघ्ने नमः ३७ खगपूजिताय नमः ३८ गतैये नमः ३९ गंगाजल स्नायिने नमः ४० घनचित्तभाय नमः ४१ घारघ्ने नमः ४२ ङशिक्षकाय नमः ४३ ङतत्रसे नमः ४४ चतुराय नमः ४५ चंद्रमोग्रजाय नमः ४६ छंदपूराय नमः ४७ छंद इडयाय नमः ४८ जय दात्रे नमः ४९ जगत्पतये नमः ५० झंझाकराय नमः ५१ झरस्नायिने नमः ५२ ञहर्त्रे नमः ५३ ञविवर्जकाय नमः ५४ टीकाकृते नमः ५५ टिट्टिभक्रीडाय नमः ५६ ठवादिमतत्हते नमः ५७ ठविदे नमः ५८ डामरे डयाय नमः ५९ डमरुधृशे नमः ६० ढक्काकृते नमः ६१ ढुंडिराट्प्रियाय नमः ६२ ण वी क्षणाय नमः ६३ ण गम्याय नमः ६४ तत्वविदे नमः ६५ तापशामकाय नमः ६६ थै थै कृते नमः ६७ थूत्कृतानार्याय नमः ६८ दत्ताय नमः ६९ दात्रे नमः ७० दयानिधये नमः ७१ धनप्रदाय नमः ७२ धर्मगोप्त्रे नमः ७३ नग्नाय नमः ७४ नष्टार्थलाभदाय नमः ७५ परशक्तये नमः ७६ पापहर्त्रे नमः ७७ फलदाय नमः ७८ फणिसूत्रभृते नमः ७९ बंधच्छिदे नमः ८० बलबज्ञेत्ते नमः ८१ भयकृते नमः ८२ भयहृते नमः ८३ भवाय नमः ८४ मत्तघ्ने नमः ८५ माहुरस्थानाय नमः ८६ यज्ञभोक्त्रे नमः ८७ यदूद्वहाय नमः ८८ रसदाय नमः ८९ रिपुसंहर्त्रे नमः ९० लाभदाय नमः ९१ लयासिद्धिदाय नमः ९२ वशिने नमः ९३ वरेण्याय नमः ९४ वरदाय नमः ९५ शांताय नमः ९६ श्रीपुरभिक्षुकाय नमः ९७ षड्बाहवे नमः ९८ षण्मतगतये नमः ९९ संसारारवे नमः १०० सह्यगाय नमः १०१ हर्षप्रदाय नमः १०२ हिताशंसिने नमः १०३ ळांतारणाय नमः १०४ ळविवर्जिताय नमः १०५ क्षराक्षरातिगाय नमः १०६ क्षंत्रे नमः १०७ ज्ञानदाय नमः १०८ ज्ञानिसद्धतये नमः इति अकारादि श्रीदत्ताष्टोत्तरशत नामावलिः

## देवांना दर्शन.

तें गुरुवाक्य मानून । गुरुचरण वन्दून । दत्ताश्रमीं देवगण । येऊन भावें वंदिती ॥ २३ ॥ दिसे मूर्ति आजानुकर । सर्वावयवीं सुंदर । अप्रतर्क्य मनोहर । दिगम्बर विशालाक्ष ॥ २४ ॥ प्रफुल्लकमळमुख । रूप दिसे सुरेख । कम्बुकंठ त्रिरेख । पाहतां सुख अपार ॥ २५ ॥ नग्नयुवती मांडिवर । घेवोनियां वारंवार । चुंबन घेई धरोनि कर । प्रेमभर आणोनी ॥ २६ ॥ स्वयें अनघ असोनी । अनघा नामें स्त्रियेलागूनी । पाचारी जो मद्यपानीं । आसक्त होवूनी मत्त दिसे ॥२७॥ असें त्याचें रूप पाहोन । देव दूर राहून । करिती साष्टांग नमन । न मनदे त्याकडे श्रीदत्त ॥ २८ ॥ श्रीदत्त चालतां चालती । उभा होतां उभे राहती । बैसतां बैसती । नमन करिती पुनः पुनः ॥ २९ ॥

## वेदशर्मा यास दर्शन.

असा करी विप्र शोक । तंव आला भिक्षुक दुर्गंधांगीं मलिन मूर्ख । दिसे लोकदृष्ट्या तो ॥ १० ॥ भिक्षा देतां त्याची कांती । पाहतां विप्रा झाली भ्रांती । म्हणे हा कीं दिनपती । माझी मती भ्रमतसे ॥ ११ ॥ करूं याचें परीक्षण । असें म्हणतां तत्क्षण । भिक्षुक धांवे त्वरा करून । पाठीं लागोन धांवे विप्र ॥ १२ ॥ भिक्षुक वनीं चालिला । द्विज पाठीसी लागला पाषाण मारी तयाला । जा जा मागें फीर म्हणे ॥ १३ ॥ मार सोसोनि ब्राह्मण । जाऊनी दृढ धरी चरण । म्हणे आलों शरण । करीं रक्षण सत्पुरुषा ॥ १४ ॥ भिक्षु म्हणे मी व्रात्य भ्रष्ट । तूं ब्राह्मण पूज्य श्रेष्ठ । विप्र म्हणे आपण वरिष्ठ । स्पष्ट देव भूलोकीं ॥ १५ ॥ हंसुनी भिक्षु दावी रूप । तों दिसे त्रिमूर्तिस्वरूप । विप्र म्हणे गेलें पाप । दर्शनें ताप नष्ट झाले ॥ १६ ॥

तुझा देव स्मशानीं बसून । अंगीं धूळ माखून । बरोबर कुत्रे घेऊन ॥ करीं क्रीडन कौतुकें ॥ ७२ ॥ तो जाणे आत्माराम । आत्मक्रीड उत्तम ज्याचे जती मुनिसत्तम । मुक्तिधाम तोचि जाण ॥ ७३ ॥

मग विप्र जाय स्मशानीं । दत्त मारी अस्थी घेऊनी । मरणभयें पळ सदनीं । भूत निर्भर्त्सूनी वदे तया ॥ ७६ ॥ मिथ्याभूत देहा भुलून । पाप्या देवा देशी सोडून । तथापि दावितों अजून । यापुढें जाण देव तुझें ॥ ७७ ॥

स्मशानीं विप्र येऊन । तशीच मूर्ति पाहून । जाऊनी दृढ धरी चरण । न सोडी ताडन करितांही ॥ ८१ ॥ म्हणे दत्त कां पाद धरिसी । विप्र म्हणे आलों क्षण द्यावयासी । येरू म्हणे भ्रष्टासी । कां देशी श्राद्धीं क्षण ॥ ८२ ॥ मी धर्माधर्मविवर्जित । विप्र म्हणे हें यथार्थ । परमात्मा समर्थ ! तुला किमर्थ धर्माधर्म ॥ ८३ ॥ हांसोनि ओं तथा म्हणे दत्त । निजस्वरूप दाखवित । कुत्रे होती श्रुति मूर्तिमंत । वायस होत शास्त्रें तीं ॥ ८४ ॥ योगभूमी दिसे स्मशान । पाहतां चकित झाला ब्राह्मण । दत्त म्हणे होतां मध्यान्ह । स्नान करूनी येतों मी ॥ ८५ ॥

## अलर्काचे अनुभव

कधीं कधीं विप्र । कधीं दिससी क्षत्र । कधीं वैश्य कधीं शूद्र । दिससी संकर कधीं तूं ॥ ९७ ॥ कधीं बाल कधीं वृद्ध ॥ कधीं किशोर कधीं प्रौढ । कधीं सुज्ञ कधीं मूढ । असा गूढ वागसी तूं ॥९८॥ कधीं होसी तूं भोगी। कधीं दिससी रागी । कधीं त्यागी विरागी । कधीं योगी भाससी ॥ ९९ ॥ तो तूं अपापविद्ध । परी भाससी अशुद्ध ॥ कधीं शुद्ध कधीं बुद्ध । कधीं बुद्ध अबुद्धसा ॥ १०० ॥ जो तूं मायाधीश । सर्वेंद्रियांचा ईश । तूंचि विज्ञानेश । तो तूं अनीश भाससी ॥ १०१ ॥ असी हे तुझी लीला । न कळे ब्रह्मादिकांला । हे अनंत लोकपाळा असो तुला नमस्कार ॥१०२॥

## एकनाथांस दर्शन.

पूजा विसर्जन करोनि समस्त ॥ मग जगद्गुरूतें ध्यानासि आणित ॥ तंव तेथें पातले अनसूयासुत ॥ परी वेष दिसत मलंगाचा ॥ १३।७४ ॥ चर्में सर्वांग वेष्टिलें जाण ॥ विशाळ आरक्त दिसती नयन ॥ स्वहस्तें तसबी फिरवून ॥ करीती ध्यान निर्गुणाचें ॥ ७५ ॥ कामधेनु घेतली बरोबरी ॥ ती दृष्टीपुढें दिसती कुतरी ॥ हें जनार्दना कळलें अंतरीं ॥ मग नमस्कार करी सद्भावें ॥ ७६ ॥ जैसें का सगुण निर्गुण ॥ दोहींत नाहीं भेद भान ॥ तैसें दत्तात्रेय आणि जनार्दन ॥ निज प्रीतीनें भेटले ॥ ७७ ॥ मग मृत्तिकापात्र काढोनि पाहें ॥ जनार्दनासि आज्ञापी दत्तात्रेय ॥ पैल ती कुतरी बैसली आहे ॥ तरी दुग्ध लवलाहें काढावें ॥ ऐसी आज्ञा होतांचि निश्चितीं ॥जनार्दनें स्वाहन घेतली हातीं ॥ कुतरी

दोहोनि सत्वरगती । दुग्ध काढिती पात्रभर ॥ ८३ ॥ स्वस्थानीं बैसले अवधूत ॥ तयांपुढें आणोनि ठेवित ॥ वाळले कुटके काढोनि त्वरित ॥ त्या भाजी त्वरित स्वहस्तें ॥ ८४ ॥ तें तरी दिव्य अन्न निर्धारीं ॥ परी दृष्टीस दिसती शिळ्या भाकरी ॥ जेवीं कां हिंडोनि घरोघरीं ॥ माधो-करी मेळविली ॥ ८५ ॥ भक्ताचा भाव पहावयासी ॥ कौतुक दाखविलें दृष्टीसी ॥ परी हें समजलें एकनाथासी ॥ तया मानसीं विकल्प ॥८६॥ तंव अवधूत म्हणती जनार्दना ॥ आमुच्यासवें बैस भोजना ॥ ऐसी आज्ञा होतांचि जाणा ॥ उल्हास मना येतसे ॥ ८७ ॥ जनार्दन आणि दत्तात्रेयमूर्ति ॥ उभयतां एके पात्रीं जेविती ॥ स्वानंदरसीं जाहली तृप्ती ॥ करशुद्ध करिती तेधवां ॥ ८८ ॥ मृत्तिकापात्रांत धुवोनि हात ॥ मुख प्रक्षाळीत स्वहस्तें ॥ मुखशुद्धि विडे घेऊन घेवोनि त्वरित ॥ स्वस्थानीं बैसत तेधवां ॥ ८९ ॥ मग एकनाथासि आज्ञापित ॥ तुवां सरोवरीं जावोनि निश्चित ॥ पात्र धुवोनि आणि त्वरित ॥ अवश्य म्हणत तयासी ॥ ९० ॥ मग सरोवराच्या पाळीं आपण ॥ बैसोनि विचार करी मनें ॥ महाप्रसाद लाधला पूर्ण ॥ तरी करावा प्राशन निजप्रीतीं ॥ ९१ ॥ सद्गुरूचें उच्छिष्ट निश्चितीं ॥ तरी हेंचि गंगा भागीरथी ॥ सकळ साधनें यांत येती ॥ उद्धारा गती होय जीवा ॥९२॥ ऐसें कल्पोनि तये क्षणीं ॥ मृत्तिकापात्र लाविलें वदनीं ॥ म्हणे मज ऐसा सभाग्य कोणी ॥ त्रिभुवनींही असेना ॥ ऐसी चर्या देखोनिया ॥ जनार्दन विनवीती दत्तात्रेया ॥ या सेवकासी जवळ बोलावोनिया ॥ दर्शन तयासी द्या स्वामी ॥ ९४ ॥ मलंगरूप धरिलें आपण ॥ यास्तव केलें नाहीं नमन ॥ तरी आपुलें निजरूप प्रगट दावणें ॥ म्हणवोनि चरण धरियेले ॥ ९५ ॥ तेव्हां दत्तात्रेय बोलती उत्तर ॥ तयासि म्हणो नये किशोर ॥ झाला विठ्ठलाचा अवतार ॥ विश्वोद्धार करावया ॥ ९६ ॥ ऐसी बोलोनि वरदवाणी ॥ स्वरूप पालटलें तयेक्षणीं ॥ जवळीं निजली होती शुनी ॥ ती कामधेनु नयनीं देखिली ॥ २०१ ॥ मलंग-वेष टाकोनि आपण ॥ रूप धरिलें सावळे सगुण ॥ षड्भुजा आकर्ण नयन ॥ श्रीमुख मंडन विश्वाचें ॥ २०२ ॥ ऐसें रूप प्रगटोनि तत्त्वतां ॥ जवळी बोलाविलें एकनाथा ॥ येरीं चरणीं ठेविला माथा ॥ होय भेटतां निजप्रीतीं ॥ ३ ॥ साही भुजा पसरोनि जाण ॥ नाथासि दिधलें आलिंगन ॥ हात उतरीत मुखावरून ॥ मग अंतर्धान पावले ॥ ४ ॥ भक्तलीलामृत.

## श्रीसमर्थ रामदासांना भेट.

जे ठायीं उभे दास समर्थ । तेथेंचि श्रीगुरुदेवदत्त । कमंडळीं उदक भरित । धरोनि हातें पातले ॥ ९ ॥ मातापुरनगीं जयाचें शयन ॥ मनकर्णिकेमाजीं नित्य मज्जन ॥ करवीरीं जयाचें भिक्षा भोजन ॥ जो सिद्ध सिद्धांचा मुनिराय ॥ ११० ॥ नित्यनेमाचें कथिलें चिन्ह ॥ येरव्हीं जेथें सद्भक्त जन । भजती वाहती तेथें पाऊन ॥ हरोनि संकट तारिती ॥ ११ ॥ रामदासा देऊन दर्शन । बोळखी वृत्तांतु सांगूनि पूर्ण ॥ करवूनिया उदक प्राशन । नेलें अवचट शिखरावरी ॥ १२ ॥ जें सिद्धमुनी योगियां रमकस्थान ॥ छाया सुशीतळ सफाळित वन ॥ तीर्थरूप सांचले जेथें जीवन ॥ विसावोन बोलत बैसलें ॥ १३ ॥ आत्रिनंदना उपजली कृपा ॥ पुसती वाटलें भय तुज बापा ॥ जी देहभूतथा थेट साटोपा—॥ माजीं नयेचि सद्भाव ॥ १४ ॥ मग हांसोनिया अनुसुयासुत ॥ निर्छायादि सांगोनि योग समस्त । मणका अमोल्य ईश्वरी दत्त । पाया स्वहस्तें बांधिला ॥ १५ ॥ जया मणीचा ऐसा प्रताप ॥ न बाधे आंगा शाप कोप ताप । यमभयें दृष्टीस न पडे अल्प ॥ संतोष वृत्ति ठसावे ॥ १६ ॥ मग स्मरतां पावेन दे भाक कोपून ॥ अवधूत पावला अंतर्धान ॥ दास निवोनि निर्भयमनें ॥ पाहात वनस्थान चालले ॥ १८ ॥

## प्रसंग दुसरा

जोगा अंबा पातले तेथुनी ॥ सहज स्वभावें विहरतांरानीं ॥ दृढ करोनि चौघे ब्राह्मणांनीं ॥ तपती श्री दत्त भेटावया ॥ ११–६४ देखोनि तयांला पुसतां वृत्तांत ॥ ते वदती तो भेटवा आत्रिसुत ॥ भाव दृढकरा वदोनि त्यांते । आपणाहे बसले त्यां सन्निधीं ॥ ६४ ॥ प्रहर येक लोटुनि गेली यामिनी ॥ दत्तात्रय आले वेष धरूनि ॥ पांच पोरांसह इच्छामोहिनी ॥ उभय करणी झळके पुढें ॥ ६५ ॥ अहंकार हल्यावरी ममता गोणी ॥ स्वस्त चि साहित्यें असे भरूनि । षड्रिपु मुरगे धरिले पाणीं ॥ बोकडा गर्व चालतो ॥ ६६ ॥ कपट कुविधा झळके दुहिता ॥ एवं गारोडी भासे तावता ॥ उतरोनि क्षुधा गे लागली म्हणतां । सयंपाक मांडिला पर्तोन तें ॥ ६७ ॥ अंतरास्थितीची चढाविली हंडी ॥ न भरे साहित्यना शाहि[illegible] थोडी ॥ सिद्ध पुरुष सांगे कापूनि कोमडी ॥ तृप्तिवर वरीं शिजवी कां ॥ ६८ ॥ मुरगे येडका टोणगा कापूनि ॥ घालितां पात्र तें न ये भरून ॥ सांगे गारोडी पोरासी छेदुनि ॥ रांधी

मांसातें निर्मो हें ॥ ६९ ॥ भजन भव्य चुली धडके निज ॥ हंडी भरेना ती सांगे गुज ॥ दावी विनोदीं ते पैलाड द्विज । आसती परदेशी कापीत्या ॥ ७० ॥ ऐसें ऐकतां कठोर वचन । ब्राह्मणीं केलें पलायन ॥ धन्य दासाचें सर्वात्मज्ञान । धैर्यनग अढळ न हाले ॥ ७१ ॥ अहींद्र महींद्र जया स्वाधीन ॥ तो पावतां समर्था सान्निधान । हासोनि संतोषें म्हणे जी भोजन । तनु सार्थकींच करावें ॥ ७२ ॥ उभारणीतें करूनि अदृश्य । साक्षात दर्शन देऊन हरुषें । निघतां नमोनि प्रार्थिलें दासें । ब्राह्मणा द्यावें दर्शना ॥ ७३ ॥ दत्त वदे ते असती कार्मिक । साक्षात्काराचें कैचें त्या सुख ॥ यद्यपि नुलंघवे सख्या तव वाक्य ॥ म्हणोनि त्या स्वप्नीं समजाविलें ॥ ७४ ॥

## प्रसंग तिसरा.

आला उद्धावीं साहित्य करूं । कीं श्रीहरीसन्निधीं पातला हरु । तवाच झुलत अनुसयाकुमरु । पालटून वयें पातला ॥ १४ ॥ वसवण्याप्रति उमाकांत । हेग्गरसासी नागनाथ । नामयालागीं पंढरीनाथ । परीक्षूं आले ज्यापरीं ॥ १५ ॥ ज्यासी अभेदें धरिले हृदयीं । त्या वळखुये बदलोनि आले जरीं । जेवि विदित आपले हद्गत जीवीं । तेवी देवभक्त एकाचि ॥ १६ ॥ संगमीं असतां दास विरक्त ॥ कंगाल वेषें पावला दत्त । स्नान करोनि जातां सुपंथें । साउली न पडे आंगाची ॥ १७ ॥ पवनपरी जैसे गोरक्ष आंग । मारुतिरी याचा निर्मळ योग ॥ पाप निर्लेप देव श्रीरंग ॥ निर्छाया निःसंग शशिबंधु ॥ १८ ॥ निर्छायाचें मानोनि आश्चर्य । शुद्धत्वयुक्तीनें धरिलें पाय ॥ छंदाछिन्न दावितां न मानिचें भय ॥ जैसा फरिद दृढमति ॥१९॥ स्तवोनि यापरि तुष्टल्या चित्तें । सुचिलें सर्वेहि ध्यान योगपंथ । कितवनाम ठेऊं दासातें ॥ प्रसन्न वरोसि योजिती ॥ २३ ॥ मुनिनाथ मुनीचा हाचि हा प्रेम । ठेवितां न साजे यासी प्रतिनाम । क्रियाकर्तृत्वीं सफाळित ब्रह्म । व्हावें सद्भक्त विसाऊं ॥ २४ ॥ अभिलादिक जनाचारिति । वडिलादेवाची नामें उपामिति । सौंदर्य शौर्य क्रिय ना शांति । प्रत्यक्षविण अशोभा ॥ २५॥ प्रतिनांव निर्मळा नासाजे म्हणत । मग नूतन क्रमाचा शोधूनि अर्थ । ठेऊनि सप्रेमें नाम समर्थ । जन धन्य प्रसिद्ध हो म्हणे ॥ २७ ॥ कथा कीर्तनीं संकटांत । हें नामचिंतन करील त्यांत । साह्य होवोनि उर्विजानाथ मनोरथातें पुरवील ॥ २८ ॥ विनवी दासांनीं आराध्य दैवत । श्रीराम माझा तोची समर्थ ॥ दत्तात्रेय वदे निशाण-

चिन्हातें । श्रीरामसमर्थ चालवा ॥ ३९ ॥ परंतु समर्थ नाम हें तुमचें । जी म्हणे कीजे विरुद्ध साचे । म्हणोनि तथास्तु सर्वे तेथेंच अंतर्धान पावला ॥ १५।४० ॥ दासविश्रामधाम.

## बहिरवबावास दर्शन

कटिं कसिला लंगोट । मस्तकी तो जटामुकूट ॥ पायीं खडावा चोखट । मैलागिरी चंदनाच्या ॥ ४२ ॥ बालसूर्यापरी कांति, चर्चिली अंगीं शुभ्र विभूति । रुद्राक्ष माळा तळपति । कंठीं दंडीं मनगटां त ॥ ४३ ॥ भाळीं त्रिपुंड्र चंदनीं । कस्तूरी तिलक मध्यें जाणीं । नानापरीच्या कुसमांनीं ॥ शोभा आणिली विशेष ॥ ४४ ॥ तीन मुखें सहा हात । सव्य करीं भिक्षापात्र । झोळी रुळे कांखेत । चार श्वान बरोबरी ॥ ४५ ॥ आदेश ऐसें बोलून ॥ प्रगटला तो दयाघन ॥ भैरवासी भाषण ॥ करितां झाला मधुरोत्तरें ॥ ४६ ॥ उभारून वरदपाणि ॥ ठेविला बहिरव शिरीं जाणीं ॥ निजकंठाची काढुनि । रुद्राक्षमाळा घातली त्या ॥ ४७ । ( भक्तिसार )

## प्रदक्षिणा—

धन्य धन्य हो प्रदक्षिणा ही सद्गुरु रायाची । झाली त्वरा सुरवरां विमान उतयाची ॥ १ ॥ पदोपदीं जाहाल्या अपार । पुण्याच्या राशी सर्वहि तीर्थे घडली आम्हां आदि करुनि काशी ॥ २ ॥ मृदंगटाळ ढोलभक्त भावार्थे गाती । नाम संकीर्तनीं गित्यानंदें वाचती ॥३॥ कोटिब्रह्म हत्या हरती करितां दंडवत । लोटांगण घालितां मोक्ष लाभे पायांत ॥ ४ ॥ गुरु भजनाचा महिमा अगम्य नियमागमांसी अनुभव जें जाणती ते गुरूपदिंचे अभिलाषी ॥ ५ ॥ प्रदक्षिणें करोनि देह घावें वाहिला । श्रीरंगात्मज विठ्ठल सन्मुख उभा हो राहिला ॥ ६ ॥

REFBK-0004241
REFBK-0004241
६२८९